# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १२५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.१२ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## निदा खानला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

नाशिक दि.११ (प्रतिनिधी)- नाशिकमधील टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि धर्मांतराचा प्रयत्न केल्याच्या प्रकरणातील मुख्य संशयित निदा खान हिला आज नाशिकरोड न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. निदा खानची पहिली पाच दिवसांची पोलीस कोठडी संपल्याने तिला आज न्यायालयात हजर करण्यात आले होते.

आजच्या सुनावणीदरम्यान न्यायालयात कोणताही मोठा युक्तिवाद झाला नाही. विशेष म्हणजे, पोलिसांनी निदा खानच्या पोलीस कोठडीत वाढ करण्यासाठी फारसा प्रयत्न केला नसल्याचे दिसून आले. निदा खान ही गरोदर असल्याने तिच्या वाढीव पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली नसल्याचे समजते. तर पाच दिवसांच्या पोलीस कोठडी निदा खान आणि तिच्या कुटुंबियांची चौकशी करण्यात आली आहे. आता निदा खानला तूर्तास पोलीस कोठडीतून मुक्तता मिळून तिची रवानगी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात (जेल) होणार आहे.

या प्रकरणातील आरोपी निदा खान हिच्या चौकशीत पोलिस तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. तपासादरम्यान निदा खान पीडितेच्या घरी जाऊन धार्मिक विधी करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच धार्मिक शिक्षण देत पीडितेला विशिष्ट धर्माची प्रार्थना आणि पोशाख स्वीकारण्यास भाग पाडल्याची माहिती समोर आली आहे.

# पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करा; खाद्यतेलाचा कमी वापर करा, शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत

## पंतप्रधान नरेंद्र मोदींची पुन्हा आज दुसऱ्या दिवशी देशवासियांना आवाहनांची साद; मात्र काँग्रेसकडून टीकेची झोड



अहमदाबाद/हैदराबाद दि.११ (वृत्तसंस्था)- पश्चिम आशियातील संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पुन्हा एकदा आवाहन केलं आहे. खाद्यतेलावर परकीय चलन जास्त प्रमाणात खर्चं होतं. त्यामुळे त्याचा कमी वापर करावा. तसेच शक्य तिथे ऑनलाईन मिटिंग घ्याव्यात, शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत असं आवाहनही मोदींनी केलं. गुजरातमधील एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी देशवासियांना ही आवाहनं केली आहेत.

पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर या आधीही पंतप्रधान मोदींनी देशवासियांना काही आवाहनं केली होती. त्यामध्ये पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करा, वर्षभर सोन्याची खरेदी करू नका, तसेच शक्य तिथे सार्वजनिक वाहनांचा वापर करा असं मोदी म्हणाले होते. आज सलग दुसऱ्या दिवशीही पंतप्रधानांनी तेच आवाहन पुन्हा एकदा केल्याचं दिसून आलं.

देशातील १४० कोटी लोकांनी फक्त एक पाऊल पुढे टाकलं तर १४० कोटी पावलं आपण पुढे जाऊ. त्यामुळे कोणतंही संकट आपल्या विकासाला अडचण ठरू शकणार नाही, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

पंतप्रधान मोदी यांनी जनतेला आवाहने केल्यानंतर विरोधी पक्षाचे नेते राहुल गांधी यांच्यासह इतर अनेकजण मोदींवर टीका करत आहेत.

### पंतप्रधानांनी देशवासियांना केलेले आवाहन

१. जोपर्यंत परिस्थिती ठीक होत नाही तोपर्यंत सोनं खरेदी करू नका.

२. भारतीयांमध्ये डेस्टिनेशन वेडिंगचा ट्रेंड वाढतोय. त्यामुळे परकीय चलनाचा साठा भरपूर खर्च होत आहे. डेस्टिनेशन वेडिंगसाठी परदेशाला प्राधान्य देऊ नका. देशात अनेक ठिकाणं ही लग्नांसाठी योग्य आहेत. त्या ठिकाणांना पसंती द्या. लग्न इथे होत असेल तर भारताच्या मातीचाही आशीर्वाद लाभेल.

३. अनेकजण परदेशात जाऊन सुट्टी एन्जॉय करतात. सुट्टीसाठी परदेशात जाण्यापेक्षा देशातील ऐतिहासिक स्थळांना भेट द्या.

४. विदेशात राहणाऱ्या भारतीयांनी पाच विदेशी पर्यटकांना भारतात आणावं, त्यांना भारत दाखववावा.

५. प्रवासासाठी मेट्रोचा जास्तीत जास्त वापर करा

६. कामाच्या ठिकाणी ऑनलाईन मिटिंगला प्राधान्य द्या.

७. शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत.

८. शेतीत स्वदेशी खाद्य वापरा. रासायनिक खतांचा वापर करू नका. डिझेल पंपाऐवजी शेतात सोलार पंपाला प्राधान्य द्या.

९. खाद्यतेलावर जास्त परकीय चलन खर्च होतं. त्यामुळे त्याचा वापर कमी करा.

१०. विदेशी साहित्यापेक्षा देशी उत्पादनांना प्राधान्य द्या. स्थानिक दुकानदारांकडूनच खरेदी करा.

### परदेशी दौरे टाळा, चार्टर्ड विमानांचा वापर करु नका-नाना पटोले

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- नाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना लिहिलेल्या पत्रात शासकीय दौऱ्यांमध्ये काटकसर करताना चार्टर्ड विमानांचा वापर करु नये, दौऱ्यांमध्ये मोठ्या वाहन ताफ्यांचा वापर करु नये, परदेशी दौरे टाळावे, मेट्रो सारख्या ट्रेनचा सर्व मंत्र्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

नरेंद्र मोदी यांनी त्यांचे भविष्यातील स्वीडन, नॉर्वे, इटली या विदेश दौऱ्यांसह तेलंगणा बंगळुरु, जामनगर या दौऱ्यांनाही कात्री लावावी आणि हे सर्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःसह त्यांच्या पक्षातील लोकप्रतिनिधी आणि स्वतः त्यांनी त्यांच्या पक्षापासून या उपक्रमाची सुरुवात करण्याच आवाहन काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केलं आहे.

भाषणात जनतेला 'डिझेल-पेट्रोल वाचवा, त्याग करा' म्हणून शहाणपण शिकवलं आणि आज स्वतःच्या रॅलीसाठी हजारो लिटर इंधन फुंकून आणि कोट्यवधींची उधळपट्टी करून मिरवताहेत ? हा कसला 'त्याग' आहे ? जनतेने फक्त महागाई सोसायची आणि तुम्ही मात्र सरकारी पैशावर इव्हेंटबाजी करायची? असे महाराष्ट्र काँग्रेसने पोस्ट करत टीका केली आहे.

### हे सरकारचे अपयश-राहुल गांधी

राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनावर टीका करताना हे सरकारचं अपयश असल्याचं नमूद केलं आहे. 'मोदीजींनी काल जनतेकडून त्याग करण्याची मागणी केली. सोनं खरेदी करू नका, विदेशात जाऊ नका, पेट्रोल कमी वापरा, खाद्यतेल कमी वापरा, मेट्रोने प्रवास करा, घरून काम करा. हे उपदेश नाहीत, त्यांच्या अपयशाचे पुरावे आहेत. १२ वर्षांत त्यांनी या देशाला अशा टप्प्यावर आणून ठेवलंय की त्यांना जनतेला सांगावं लागतंय काय खरेदी करा, काय करू नका, कुठे जा, कुठे जाऊ नका. प्रत्येकवेळी स्वत:चा बचाव करण्यासाठी सगळी जबाबदारी जनतेवर टाकून मोकळे होतात. हा देश चालवणं आता तडजोड केलेल्या पंतप्रधानांच्या आवाक्यातली गोष्ट राहिलेली नाही' अशी टीका राहुल गांधींनी केली आहे.

### फडणवीस यांच्याकडून पंतप्रधानांच्या आवाहनांचे समर्थन

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या आवाहनाचं समर्थन करताना त्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेजारी राष्ट्र पाकिस्तानचं उदाहरण दिलं आहे. नागपूरमध्ये माध्यमांशी बोलताना त्यांनी यावर आपलं मत मांडलं. 'सगळ्यांनाच माहिती आहे की जगात अमेरिका-इस्त्रायल व इराणच्या युद्धामुळे तेल आणि गॅसची कमतरता निर्माण झाली आहे. आपल्या शेजारी राष्ट्रांमध्ये तर याची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. त्याच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. पाकिस्तानात ४५० रुपये लिटर एवढा भाव पेट्रोलचा झाला आहे', असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## होर्मुझ सामुद्रधुनीत 'इराण'कडून टोल वसुलीस सुरुवात; नियमावली जारी

तेहरान दि.११ (प्रतिनिधी)- इराणने नव्याने सादर केलेला शांतता प्रस्ताव डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा फेटाळून लावला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील नाकेबंदीमुळे आर्थिक कोंडीत सापडलेला इराण या संकाटातून मार्ग काढण्यासाठी धडपड करत आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून ये-जा करणाऱ्या जहाजांवर टोल आकारण्याचा विचार इराण करत असल्याची माहिती काही दिवसांपूर्वी समोर आली होती. दरम्यान, याबाबत आता इराणने हालचाली सुरु केल्या असून, सध्या टोल आकारण्यास सुरुवात केल्याचे एका जहाज वाहतूक नियतकालिकाने म्हटले आहे. होर्मुझवर पूर्ण नियंत्रण मिळविण्याच्या प्रयत्नाचा हा एक भाग असल्याचे सांगितले जात आहे.

पर्शियन गल्फ सामुद्रधुनी प्राधिकरणाने याबाबत एक नियमावली जाहीर केली आहे. ''याद्वारे होर्मुझ सामुद्रधुनीतून प्रवास करण्यासाठी परवाना घ्यावा लागणार आहे, शिवाय यासाठी आवश्यक शुल्क देखील भरावे लागेल'', असे स्पष्ट करण्यात आले आहे. नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार, होर्मुझमधून प्रवास करणाऱ्या जहाजांना सर्व माहिती देणं बंधनकारक करण्यात आले आहे. जहाज मालकाचे नाव, विमा कंपनी, जहाजावरील सदस्यांची माहिती आणि प्रवासासाठी निश्चित मार्ग याची माहिती प्राधिकरणाला द्यावी लागणार आहे.

यासाठी ४० प्रश्नांचा समावेश असलेला अर्ज तयार करण्यात आला आहे. यात विविध प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. जहाजाचे नाव, सदस्यांची नावं, ओळख, पूर्वीची ओळख, देश, निश्चित स्थान, राष्ट्रीयत्व इ. बाबींचा समावेश करण्यात आला आहे. या अर्जात देण्यात येणारी माहिती सत्य आणि संपूर्ण स्वरुपात देण्यात यावी असेही प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे. अर्जात भरण्यात आलेल्या माहितीचा ई-मेल प्रवास सुरु करण्यापूर्वी प्राधिकरणाला पाठविण्यात यावा, यानंतर प्राधिकरणाकडून ई-मेलद्वारेच पुढील सूचना दिली जाईल, असे अहवालात म्हटले आहे. अर्जातील माहिती चुकीची असल्याचे आढळून आल्यास अडथळे येऊ शकतात असाही इशारा देण्यात आला आहे.

## सरकारला कामगारांची मेहनत नव्हे फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात-विजय वडेट्टीवार

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात कामगारांची अवस्था बिकट झाली आहे. सध्या देशातील जवळपास २५ टक्के कामगारांना किमान वेतनही मिळत नाही. देश चालवणाऱ्यांना कामगारांची मेहनत दिसत नाही, फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी केंद्र सरकारवर निशाणा साधताना केली.

एसबीआयचा पीएलएफएस २०२५ अहवाल नुकताच जारी झाला. विजय वडेट्टीवार यांनी या अहवालाचा दाखला देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारवर उपरोक्त शब्दांत निशाणा साधला. ते म्हणाले, सबका साथ, सबका विकास म्हणणाऱ्या मोदी सरकारच्या काळात कामगारांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या २०२५ अहवालानुसार देशातील जवळपास २५टक्के कंत्राटी कामगारांना किमान वेतनही मिळत नाही. महिलांची अवस्था तर आणखी वाईट आहे. देश चालवणाऱ्यांना मात्र कामगारांची मेहनत दिसत नाहीत, फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात.

नवीन लेबर कोडच्या नावाखाली भाजप सरकारने कामगारांचे हक्कच कमजोर केले आहेत. संप करायचा असेल तर ६० दिवस आधी नोटीस द्या, तक्रार प्रलंबित असेल तर संप बेकायदेशीर ठरेल, सुरक्षा नियम मोडले तरी पैसे भरून सुटका मिळेल. म्हणजे कामगारांनी फक्त काम करत राहायचं, प्रश्न विचारायचे नाहीत, हक्क मागायचे नाहीत. व्यवसाय सुलभताच्या नावाखाली सामान्य जनतेच्या माथी मारलं जात आहे.

भाजपची अर्थनीती आता स्पष्ट दिसते आहे. गरीबांची मेहनत स्वस्त करा, कामगारांचा आवाज दाबा आणि उद्योगपती मित्रांसाठी रेड कार्पेट अंथरा. पण लक्षात ठेवा, मजुरांच्या हाडांवर उभे केलेले महाल जास्त काळ टिकत नाहीत, असे ते म्हणाले.

## 'एसआयआर'मुळे बंगाल आणि केरळमधील निवडणुकांच्या निकालांवर परिणाम झाला असण्याची शक्यता-काँग्रेस खासदार शशी थरूर

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसंस्था)- स्टॅनफोर्ड इंडिया कॉन्फरन्समध्ये बोलताना काँग्रेस नेते शशी थरूर यांनी विशेष सखोल पुनरावलोकनमुळे पश्चिम बंगालच्या निवडणुकीच्या निकालांवर परिणाम झाला असावा, असे मत व्यक्त केले. मतदार यादीतून नावे वगळल्याचा मुद्दा त्यांनी भाजपच्या विजयाच्या फरकाशी जोडला आहे. विशेष सखोल पुनरावलोकनमुळे मोठ्या प्रमाणावर नावे वगळल्याने निवडणुकीच्या निकालावर परिणाम झाला असावा, असे ते म्हणाले.

स्टॅनफोर्ड इंडिया कॉन्फरन्स दरम्यान 'इंडिया, दॅट इज भारत' या गोलमेज परिषदेत बोलताना थरूर म्हणाले, ''एसआयआरच्या बाबतीत मी जे म्हटले आहे, तो एक वैध प्रश्न आहे. या प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतून सुमारे ९१ लाख नावे वगळण्यात आली. बंगालचे उदाहरण पाहा; ९१ लाख नावे मतदार यादीतून वगळण्यात आली, त्यापैकी ३४ लाख हयात व्यक्तींनी अपील केले आहे की ते जिवंत आहेत आणि त्यांना मतदानाचा कायदेशीर हक्क आहे. नियमांनुसार प्रत्येक प्रकरणावर स्वतंत्रपणे निर्णय देणे आवश्यक होते, परंतु मतदानापूर्वी केवळ काही शेकडो प्रकरणांवरच निर्णय देण्यात आले. आजवर असे सुमारे ३१-३२ लाख लोक आहेत, जे निर्णय प्रक्रिया पूर्ण झाल्यावर वैध मतदार असल्याचे आढळू शकतात; परंतु त्यांनी मतदानाची संधी गमावली आहे.''

भाजपच्या सुमारे ३० लाख मतांच्या विजयाचे अंतर हे प्रलंबित मतदार अपीलांच्या संख्येच्या जवळपास असल्याचे निदर्शनास आणून देत थरूर यांनी या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. थरूर म्हणाले, ''भाजपने बंगाल ३० लाख मतांच्या फरकाने जिंकला. आता तुम्हीच सांगा, हे पूर्णपणे न्याय्य आणि लोकशाहीला धरून आहे का? हाच माझा प्रश्न आहे. खरे सांगायचे तर, बनावट, रद्द केलेले, अनुपस्थित किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळण्यास माझी कोणतीही हरकत नाही.''

## 'एसआयआर'वरुन कोर्टात गेलेल्या ममता बॅनर्जींना दाद मागता येणार

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसंस्था)- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत अनपेक्षित पराभवानंतर सत्ता गमावलेल्या ममता बॅनर्जी आणि त्यांच्या तृणमूल काँग्रेसने आता सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. मतदार यादीतील नावे वगळण्याच्या प्रक्रियेमुळे ३१ जागांच्या निकालावर थेट परिणाम झाल्याचा दावा टीएमसीने केला आहे. यावर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने ममता बॅनर्जी आणि अन्य उमेदवारांना यासंदर्भात स्वतंत्र याचिका दाखल करण्याची मुभा दिली आहे.

निवडणुकीपूर्वी राबवण्यात आलेल्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे वगळण्यात आली होती. तृणमूल काँग्रेसचा आरोप आहे की, भाजपच्या विजयी उमेदवारांच्या मतांचे अंतर आणि वगळलेली नावे यांचा हिशोब मांडला, तर मोठी गडबड झाल्याचे दिसून येते.

टीएमसीचे वकील कल्याण बॅनर्जी यांनी सांगितले की, तब्बल ३१ विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपच्या विजयाचे (पान ४ वर)

## पश्चिम आशियातील तणावावर केंद्र सरकार सतर्क

### राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली दीड तास बैठक; इंधन-खत पुरवठ्याचा आढावा

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसंस्था)- पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी मंत्रिगटाची बैठक पार पडली. सुमारे दीड तास चाललेल्या या बैठकीत देशातील ऊर्जा पुरवठा आणि आवश्यक वस्तूंच्या उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



या बैठकीला केंद्रीय आरोग्य व रसायन-खते मंत्री जे. पी. नड्डा, पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्यासह अन्य वरिष्ठ मंत्री उपस्थित होते. पश्चिम आशियातील संघर्षाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर आणि पुरवठा साखळीवर होणाऱ्या संभाव्य परिणामांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा भारतावर होणारा परिणाम तपासण्यात आला. तसेच एलपीजी, पेट्रोल, डिझेल आणि खतांचा पुरवठा अखंडितपणे सुरू राहावा यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा झाली.

राजनाथ सिंह यांनी बैठकीनंतर सांगितले की, ''पश्चिम आशियातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या जोखमींच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा पुरवठा (पान ४ वर)

## सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराला पंडित नेहरूंनी विरोध केला होता-पंतप्रधान

सोमनाथ दि.११ (वृत्तसंस्था) गुजरातच्या सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारानंतर झालेल्या उद्घाटनाला आज ७५ वर्षे पूर्ण झाली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मंदिराला भेट घेऊन महादेवाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी जनतेशीही संवाद साधला. सोमनाथ मंदिराला पंडित जवाहरलाल नेहरू यांनी विरोध दर्शवला होता, मात्र, सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या प्रयत्नांमुळे या मंदिराचा जिर्णोद्धार होऊ शकला, असं पंतप्रधान मोदी आज म्हणाले.

''देशाची ओळख आणि स्वाभिमानाशी निगडित असलेल्या अनेक स्थळांचा परकीय आक्रमकांनी इतिहासात विध्वंस केला. मात्र, संधी मिळाल्यानंतर त्या त्या देशांतील नागरिकांनी एकत्र येत आपली ओळख आणि राष्ट्रीय गौरव पुन्हा प्रस्थापित केला. पण भारतात मात्र राष्ट्रीय स्वाभिमानाच्या मुद्द्यांवरही राजकारण करण्यात आले, अशी टीका मोदींनी केली.

सोमनाथ मंदिराचा उल्लेख करताना, स्वातंत्र्यानंतर देशाने हाती (पान ४ वर)

## राज्यात पुन्हा उष्णतेच्या लाटसदृशय स्थिती; तापमानाचा पारा ४५ ते ४६ अंशांवर

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- राज्यात एप्रिल महिन्यात विदर्भात अनेक दिवस उष्णतेची लाटसदृश्य स्थिती कायम होती. या दरम्यान तापमानाचा पारा ४५ ते ४६ अंशांवर पोहोचला होता. मागील काही दिवसांपासून राज्यात बहुतांश भागात पश्चिमी विक्षोभाच्या (वादळाच्या) स्थितीमुळे पावसाची नोंद होत होती. यामुळे नागरिकांना तीव्र उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र, पुढील चार दिवस राज्यातील काही भागात उष्णतेची लाटसदृश्य स्थिती राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. यामुळे नागरीकांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागणार आहे.

गुजरात आणि राजस्थान येथील काही भागांत उष्णतेची लाटसदृश्य स्थितीची नोंद होत आहे. तसेच राजस्थान येथे काही ठिकाणी धुळीची वादळेही निदर्शनास येत आहेत. तर राज्यातही मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागातील कमाल तापमानात वाढ नोंदली जात आहे. दरम्यान, रविवारी राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत तापमानाचा पारा ४० अंशांवर पोहोचला. यामुळे राज्यात पुन्हा उन्हाचा तडाखा वाढताना दिसत आहे. तसेच राज्यात पश्चिमी विक्षोभाचा (वादळाचा ) प्रभाव कमी होत आहे. पुढील काही दिवस राज्यातील काही भागात कोरडे हवामान तर काही भागात उष्णतेची लाटसदृश्य स्थिती राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

कोकण प्रदेशातील बहुतांश भागात उष्ण आणि दमट वातावरण आहे तसेच दक्षिण कोकणातील काही भागात पावसाची नोंद होत आहे. तर उत्तर कोकणातील ठाणे, पालघर, मुंबई येथे नागरिकांना उष्णतेचा त्रास सहन करावा लागत असून ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील अंतर्गत भागात उन्हाचा तडाखा अधिक जाणवत आहे.

धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि नाशिक घाट विभाग, छत्रपती संभाजीनगर, जालना आदी भागात उष्णतेची लाटसदृश्य स्थिती राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली असून या भागांना उष्णतेचा 'यलो अलर्ट ' देण्यात आला आहे.

## मी माफी मागणार नाही, शिक्षा भोगण्यास तयार, हक्कभंग समितीसमोर सुषमा अंधारे यांची साक्ष

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- आपण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी कोणतेही विधान केलेले नाही. आपले विधान हे हॅबिटॅट स्टुडिओत झालेल्या तोडफोड करणाऱ्यांविरोधात होते. त्यात कोणीही विधिमंडळाचा सदस्य नव्हता. आपल्या विधानाचा विपर्यास करण्यात आला असून माफी मागणार नाही. हक्कभंग समितीचा आदर ठेवून त्यांनी कोणतीही शिक्षा दिल्यास ती भोगण्यास तयार असल्याचे शिवसेना (ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी हक्कभंग समितीसमोर झालेल्या सुनावणीदरम्यान स्पष्ट केले.

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराच्या एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबनात्मक गाण्याला पाठिंबा देणारे वक्तव्य केल्यामुळे शिवसेना (ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे यांच्याविरोधात विधान परिषदेत हक्कभंग मांडण्यात आला होता. या हक्कभंगावरील सुनावणी हक्कभंग समितीचे अध्यक्ष प्रसाद लाड यांच्यासमोर पार पडली. यावेळी समितीचे सदस्य आमदार अनिल परब, प्रवीण दरेकर, मनीषा कायंदे उपस्थित होत्या. या सुनावणीवेळी सुषमा अंधारे यांना त्यांनी कुणाल कामगाराच्या विडंबात्मक गाण्याला पाठिंबा देणाऱ्या समाजमाध्यमावरील संदेश तसेच वक्तव्यावरून स्पष्टीकरण विचारण्यात आले.

याला उत्तर देताना अंधारे यांनी आपण केलेले वक्तव्य हे एकनाथ शिंदे यांच्याविषयी नव्हते. (पान ४ वर)

## राहुल गांधी देशाच्या राजकारणातील रिजेक्टेड माल: देवेंद्र फडणवीस यांची बोचरी टीका

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी बनवण्याच्या दिशेने सरकार वेगाने पावले उचलत असून, त्याचा मोठा फायदा सर्वसामान्यांना मिळणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. आज सीआयआयच्या वार्षिक बैठकीतनंत माध्यमांशी बोलताना त्यांनी उद्योगांसाठी आणि घरगुती ग्राहकांसाठी वीज दरात मोठी कपात होणार असल्याची माहिती दिली. तसेच, इंधन बचतीच्या मुद्द्यावरून पंतप्रधान मोदींवर टीका करणाऱ्या राहुल गांधींचा रिजेक्टेड माल असा उल्लेख करत, आम्ही त्यांना महत्त्व देत नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

द फ्युचर या संकल्पनेवर आधारित असलेल्या सीआयआय बिझनेस समिटमध्ये मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीचा अहवाल सादर केला. ''भविष्यात महाराष्ट्र कसा असेल? आणि तो आम्ही कसा घडवतो? हे मी सांगितले आहे. महाराष्ट्र आज वेगवेगळ्या क्षेत्रात लीडर आहे, हे याठिकाणी सांगितले. इंजिनिअरिंग, एफडीआय, स्टार्टअप, अशा क्षेत्रामध्ये महाराष्ट्र क्रमांक एक वर आहे. अशा महाराष्ट्राच्या स्ट्रेंथ लिबरेज करून आम्ही ट्रिलियन डॉलर इकोनॉमी कशी तयार करतोय, याची माहिती दिली,'' असे फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी मुख्यमंत्र्यांनी वीज दराबाबत महत्त्वाची माहिती दिली.

''२०२५ ते २०३० या काळासाठीचे मल्टी इअर टॅरिफ मंजूर झाले आहेत. पूर्वी दरवर्षी विजेचे दर ९ टक्क्यांनी वाढायचे. मात्र, आता नवीन धोरणानुसार उद्योगांसाठी दरवर्षी वीज दरात २ ते ३ टक्के कपात होणार आहे. घरगुती वापरासाठी येत्या पाच वर्षांत वीज दरात तब्बल २६ टक्क्यांनी कपात होणार आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील उद्योग अधिक स्पर्धात्मक होतील आणि सर्वसामान्यांच्या खिशावरील भारही कमी होईल,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# ओढून ताणून आणलेला सुखान्त

अखेर 'विजय ' नामक अभिनेता कम नेत्याचा तीन दिवस चाललेला 'खट्टा-मिठा' चित्रपट एकदाचा संपला. या कथेत चित्रपटाला आवश्यक ते चढ उतार, सस्पेन्स, आक्रस्ताळेपणा, रहस्यमयता सर्व काही होते. शेवटी सिनेमांत जसा मुलीचा बाप शेवटपर्यंत ताणून धरतो आणि अखेर मुलीच्या विवाहाला संमती देतो त्याप्रमाणे विजयच्या संयमाची परीक्षा पाहिल्यावर राज्यपाल आर्लेकर यांनी एकदाचा शपथविधीचा मुहूर्त ठरवला त्याप्रमाणे १० मे ला सकाळी १० वाजता एकदाचे गंगेत घोडे न्हाईल. पण वधूपिता जसा मुलीच्या प्रेमाविवाहच्या सफलतेविषयी साशंक असतो तशीच काहीशी राज्यपालांची अवस्था झाली असावी कारण विधिमंडळातील विश्वासदर्शक ठरावाच्या अग्निपरीक्षेत विजय कितपत यशस्वी होईल याबद्दल शंकेची पाल राज्यपालांच्या मनात निश्चितच चुकचूकत असेल. याला कारणेही तशीच आहेत.

एकतर विजयला स्वबलावर बहुमत मिळालेले नाही.

तो ज्या पक्षांच्या विरोधात निवडणूक लढला त्यांचीच मदत त्याला सत्तेचा सोपान चढण्यासाठी घ्यावी लागली आहे. सर्व बारक्या बारक्या पक्षांचे 'कडबोळे' एकत्र करून सुद्धा त्याचे बहुमत अगदी काठावरचे आहे. यापैकी एखाद्या पक्षाची बुद्धी जर ऐन वेळी फिरली तर विजय अडचणीत येऊ शकतो. अण्णा द्रमुकचा फुटीर गट विजयच्या मदतीला धावून आला तरच 'friend in need is friend indeed' या जगराहटीनुसार विजय तरुन जाईल पण तो कायम अण्णा द्रमुकचा उपकृत राहील आणि त्यांच्या दबावात त्याला दिवस काढावे लागतील.


जे लिंबूटीम्बू पक्ष विजयच्या वळचणीला जाऊन बसले आहेत ते अजूनही स्टॅलिनच्या द्रमुक आघाडीचे सदस्य आहेत. किंबहुना स्टॅलिनची परवानगी घेऊनच ते विजयच्या वरातीत सामील झाले आहेत. स्टॅलिन ज्या वेळी लगाम खेचेल त्यावेळी हे सर्व घरवापसी करतील.

दोन्ही communist पक्षांनी विजयला बाहेरून पाठिंबा दिला आहे. या दोन्ही पक्षांचा डोळा राज्यसभेच्या सीटवर असणार आहे. आजपर्यंत द्रमुक पक्षाने त्यांना जसे पोसले तसेच विजयने आपल्याला सांभाळावे अशीच त्यांची अपेक्षा असणार आहे. डी. राजा नावाचे लेर्गीपिळीं नेते द्रमुकच्या उपकारामुळे वर्षानुवर्षे राज्यसभेची जागा अडवून बसले आहेत. आता द्रमुकच्या जागा घटल्यामुळे त्यांनी विजयच्या कळपात उडी मारली आहे.

व्ही सी के पक्षाने आत्ताच उपमुख्यमंत्रीपद, मंत्रीपद, विजय ज्या एका जागेचा राजीनामा देईल ती जागा आणि ३ शहरांचे महापौरपद अशा फार्माईशी केल्या आहेत. या पक्षाचे फक्त २ सदस्य निवडून आले आहेत तरी एवढे ब्लॅकमेलिंग. मग काँग्रेस काय गप्प बसेल का? त्यांचे आमदार काही उपाशी राहण्यासाठी विजयच्या दारात आलेले नाहीत. या सर्वांचे चोचले पुरवता, पुरवता विजयच्या नाकी नऊ येणार आहेत. त्यातच विजयच्या पक्षाचे जे १०७ आमदार निवडून आले आहेत ते काही त्याग, तपस्या, बलिदान ' करायला आलेले नाहीत. विजय उत्तम अभिनेता असेल पण राजकारणातील 'सर्कस ' चालवण्यासाठी आवश्यक असणारे 'रिंग मास्टर ' चे गुण त्याच्यात आहेत की नाहीत हे काळच ठरवेल. एकूणच हे जहाज लाटांवर हेलकावे खातच आपली वाटचाल करेल. एखादी जीवघेणी लाट या सरकारचा केव्हा बळी घेईल ते सांगता येत नाही. तोपर्यंत विजयच्या फॅनक्लबला करू देत उन्माद. तामिळ जनतेला थोड्याच काळात पुन्हा निवडणुकीला सामोरे जावे लागेल अशीच चिन्हे आहेत.

**– रघुनंदन भागवत**

## परिचारिका (कविता)



परिचरिकांचा असे रुग्ण सेवा धर्म
रुग्णांचे जाणतात त्याच सर्व मर्म
रुग्णांच्या सेवेत आपुलकी असे
परिचरिकांच्या ठायी जिव्हाळा वसे
नाईटिंगलचा वसा परिचारिकाच्या ठायी
रुग्णसेवेचा धर्म रुग्णांच्या माई
परिचरिकांच्या ठायी सामाजिक जाण
रुग्ण सेवेचा त्यांना सार्थ अभिमान
परिचारिका सेवेचा गौरव करू या
नाईटिंगल कार्याचा वसा चालवू या
रुग्णांची सेवा जगी असे महान
परिचारिका सेवेला करू या सलाम

**– धोंडिरामसिंह राजपूत**

# आधुनिक नर्सिंगच्या फाऊंडर: लेडी फ्लोरेन्स नाईटिंगल!

**फ्लोरेन्स नाईटिंगल या धनाढ्य कुटुंबातून आल्या होत्या. तरीही त्यांनी आपले सर्व जीवन रुग्णसेवेला अर्पण करण्याचा निर्णय घेतला. अनेक आधुनिक सुश्रुषा पद्धती त्यांनी विकसित केल्या. लंडनमध्ये त्यांनी केलेल्या रुग्णसेवेमुळे सैनिकांचा मृत्यू दरही ६९ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आला होता. त्या रात्री रात्री जागून तासनब तास रुग्णांची सेवा करत असत. रात्री हातात लँप- कंदील घेऊन प्रत्येक रुग्णाची काळजी घेत असत. त्यामुळे त्यांना लॅम्प लेडी असेही म्हटले जात असे. रोचक माहितीपूर्ण असा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख... संपादक.**

चीनच्या वुहान शहरापासून वाढत गेलेल्या कोरोना विषाणूच्या प्राणघातक संसर्गाने जगभर धुमाकूळ घातला होता. भारतातही कोरोना बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली होती. कोरोनाच्या मोठ्या लढ्यात डॉक्टर, परिचारिका, पोलीस, शिक्षक हे दोन वर्षांपर्यंत चोख भूमिका बजावत होते. जागतिक स्तरावर मातृदिन, पितृदिन आणि आणखी काही दिवस साजरे केले जातात. तसेच रुग्णांची सेवा करणाऱ्या परिचारिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी १२ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो. सन १९७१मध्ये आंतराष्ट्रीय परिचारिका परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. आधुनिक नर्सिंगच्या फाऊंडर लेडी फ्लोरेन्स नाईटिंगल यांचा जन्म ज्या तारखेला झाला, तो दिवस जागतिक परिचारिका दिवस म्हणून घोषित करण्यात आला. तेव्हापासून अख्ख्या विश्वाच्या पाठीवर १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. फ्लोरेन्स नाईटिंगल या धनाढ्य कुटुंबातून आल्या होत्या. तरीही त्यांनी आपले सर्व जीवन रुग्णसेवेला अर्पण करण्याचा निर्णय घेतला. अनेक आधुनिक सुश्रुषा पद्धती त्यांनी विकसित केल्या. लंडनमध्ये त्यांनी केलेल्या रुग्णसेवेमुळे सैनिकांचा मृत्यू दरही ६९ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आला होता. त्या रात्री रात्री जागून तासनतास रुग्णांची सेवा करत असत. रात्री हातात लँप- कंदील घेऊन प्रत्येक रुग्णाची काळजी घेत असत. त्यामुळे त्यांना लॅम्प लेडी असेही म्हटले जात असे. थोडक्यात त्यांची माहिती- फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा जन्म १२ मे १८२० रोजी झाला. त्या अग्रगण्य परिचारिका, लेखक व संख्याशास्त्रज्ञ होत्या. इ.स.१८५३ साली झालेल्या क्राइमियन युद्धादरम्यान जखमी सैनिकांची सुश्रुषा केल्याबद्दल त्यांना प्रसिद्धी मिळाली. त्यांना लेडी विथ द लॅम्प असेही म्हणत. अतिशय सुखवस्तू घराण्यात जन्म होऊनही परमेश्वराने आपल्याला भूतदयेसाठी व मानवतेची सेवा करण्यासाठीच जन्माला घातले, या भावनेने त्या प्रेरित झाल्या होत्या. रेडक्रॉसचे संस्थापक हेन्री ड्युनेन्ट यांनी त्यांना लेडी विथ द लॅम्प ही उपाधी दिली. त्यांच्या हातातील कौशल्य व वैज्ञानिक दृष्टिकोनातून रूग्णसेवा केल्यामुळेच परिचर्याशास्त्राला नवीन दिशा प्राप्त झाली. त्यांच्या सन्मानाप्रित्यर्थ १२ मे हा त्यांचा जन्मदिवस जगभरामध्ये जागतिक परिचर्यादिन म्हणून साजरा केला जातो. फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांना बालपणापासूनच गणितात गती होती. आकडेवारी आलेखांच्या माध्यमातून दृश्य सादरीकरण करणे, हे त्याकाळात फारसे प्रचलित नव्हते. विल्यम प्लेफेअर यांनी विकसित केलेल्या पाय आकृतीसारख्या आलेखांचा त्यांनी परिणामकारकरित्या वापर केला. नाइटिंगेल यांचे संख्या शास्त्रातील सर्वात महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे त्यांनी विकसित केलेली ध्रुवीय क्षेत्र आकृती होय. या प्रकारच्या आलेखास नाइटिंगेल रोझ प्लँट असेही म्हटले जाते. स्वतः काम करीत असलेल्या लष्करी रुग्णालयातील दर महिन्यातील मृत्यूंची संख्या व कारणे यांचे सादरीकरण करण्यासाठी त्यांनी या आकृतीचा वापर केला. एरवी आकडेवारीच्या जंजाळामुळे संसद सदस्य आणि सरकारी अधिकारी यांच्याकडून असे अहवाल दुर्लक्षित राहात असत. परंतु नाइटिंगेल यांनी केलेल्या प्रभावशाली दृश्य सादरीकरणामुळे सैनिकांसाठीच्या वैद्यकीय सुविधा किती अपुऱ्या आहेत? याची जाणीव होऊन या वैद्यकीय सुविधांचा दर्जा सुधारण्याचे प्रयत्न सुरू झाले. या सर्व कामामुळे रॉयल स्टॅटिस्टिकल सोसायटीच्या पहिल्या महिला सभासद होण्याचा सन्मान सन १८५९ साली नाइटिंगेल यांना प्राप्त झाला. पुढे अमेरिकन स्टॅटिस्टिकल असोसिएशनने देखील त्यांना सन्माननीय सदस्यत्व बहाल केले गेले. त्यांचे दि.१३ ऑगस्ट १९१० रोजी दुःखद निधन झाले.



– संकलन व शब्दांकन –
**श्री निकोडे कृष्णकुमार आनंदी-गोविंदा.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

परिचारिकांना आजही अनेक समस्या भेडसावत आहेत. तरीही त्या रुग्णसेवेला प्राधान्यक्रम देत त्या रुग्णांची सेवा करीत असतात. हजारो परिचारिका वैद्यकीय क्षेत्रात सक्रिय कार्यरत आहेत. मध्यंतरी मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनीही परिचारिकेचा गणवेश परिधान करून नायर रुग्णालयाला भेट दिली होती. किशोरी पेडणेकर यांनी काही वर्षांपूर्वी नायर रुग्णालयात परिचारिका म्हणून आपली सेवा बजावली होती. कोविड युद्धात स्वतः उतरून त्यांनी एकप्रकारे परिचारिकांना मानवंदना दिल्याचे सांगितले जाते. कोणत्याही रुग्णालयातील रुग्ण हा डॉक्टरांपेक्षा अधिक काळ परिचारिकेच्या देखरेखीखाली असतो. रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांची त्या अहोरात्र सेवा करीत असतात. रुग्णाला सकारात्मकता प्रदान करणे व त्यांना आनंद देणे हे महत्त्वाचे कार्य त्या करीत असतात. आताच्या घडीलाही कोरोनासारख्या महाभयंकर व जीवघेण्या संकटकाळात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. कुटुंबांची, मुलांची, प्रसंगी आपल्या जीवाची पर्वा न करता दिवस-रात्र झटून त्या आपली सेवा अत्यंत चोखपणे बजावत असत. अनेक रुग्णालयातील परिचारिका तर गेले कित्येक दिवस आपल्या घरीदेखील गेल्या नाहीत. वैद्यकीय क्षेत्रात त्यांचे योगदान अमूल्य असेच आहे. त्यांच्याशिवाय वैद्यकीय क्षेत्र पूर्णत्वास जाऊ शकत नाही.

वैद्यकीय क्षेत्रातील रुग्णसेवेत प्रमुख भूमिका बजावणाऱ्या परिचारिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जागतिक परिचारिका दिन साजरा केला जातो. कोरोना संकटकाळात त्या खऱ्या योद्धा बनून अहोरात्र रुग्णसेवा करत राहिल्या. त्यांच्या कार्याला माझा या शब्दप्रपंचाने सलाम!

!! रुग्णसेवेत सर्वस्व पणाला लावणाऱ्या जगातील समस्त सिस्टर्सना कोटी कोटी सॅल्यूट !!

## जागतिक परिचारिका दिन: मायेच्या स्पर्शामागची अदृश्य ताकद

# रुग्णाच्या वेदनेसमोर उभा राहणारा मायेचा हात आणि आरोग्य व्यवस्थेचा खरा कणा

**रुग्णालयाच्या** दारातून आत पाऊल टाकताच माणूस सर्वप्रथम ज्या भावनेला सामोरा जातो, ती म्हणजे असुरक्षितता. आजारपण माणसाला केवळ शारीरिकदृष्ट्या कमकुवत करत नाही तर त्याच्या म नात भीती, अस्वस्थता आणि अनिश्चिततेचे ढगही दाटवते. ङ्करुग्णालयात डॉक्टर उपचार सुरू करतात पण रुग्णाच्या मनातला पहिला धीर अनेकदा परिचारिकेच्या स्पर्शातूनच जन्म घेतो.ङ्क म्हणूनच रुग्णसेवेच्या जगात परिचारिका ही केवळ आरोग्य व्यवस्थेतील एक कर्मचारी नसते, तर ती उपचार आणि मानवता यांच्यातला सर्वांत जिवंत दुवा असते. दरवर्षी १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून पाळला जातो. आधुनिक परिचर्या सेवेची जननी मानल्या जाणाऱ्या ऋश्रेीशपलश छळसहींळपसरश्रश यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस साजरा होतो. पण हा दिवस केवळ औपचारिक अभिनंदनाचा नसावा तर तो समाजाच्या आत्मपरीक्षणाचाही दिवस असायला हवा. कारण आरोग्य व्यवस्थेच्या भक्कम इमारतीचा पाया जर कोणी असेल, तर तो परिचारिकांच्या निः शब्द, सातत्यपूर्ण आणि समर्पित सेवेत आहे.

परिचारिका म्हणजे फक्त इंजेक्शन देणारी किंवा औषधे वेळेवर देणारी व्यक्ती, अशी अनेकांची अजूनही मर्यादित समजूत आहे. प्रत्यक्षात परिचारिका रुग्णाच्या वेदनेचे सूक्ष्म निरीक्षण करते, त्याच्या प्रकृतीतील बदल सर्वप्रथम ओळखते, नातेवाईकांच्या प्रश्नांना संयमाने उत्तर देते, डॉक्टरांच्या सूचनांचे काटेकोर पालन करते आणि गरज पडल्यास मानसिक आधारही देते. तिची भूमिका केवळ वैद्यकीय प्रक्रियेत मर्यादित नसते तर ती मानवी वेदनेशी थेट संवाद साधणारी असते. रुग्णालयात रात्रीचे अंधारलेले तास असोत किंवा पहाटेची वेळ रुग्णाच्या पलंगाजवळ जागी असणारी व्यक्ती अनेकदा परिचारिकाच असते. डॉक्टरांचे राऊंड ठराविक वेळी असतात, पण परिचारिकेची ड्युटी वेळेशी बांधलेली नसते. तिच्या जबाबदारीला घड्याळाचे काटे नसतात. कधी अतिदक्षता विभागात जीवन-मरणाच्या सीमारेषेवर झुंजणाऱ्या रुग्णाची काळजी, तर कधी प्रसूती कक्षात नवजीवनाच्या स्वागताची धावपळ, प्रत्येक ठिकाणी परिचारिकेची उपस्थिती अपरिहार्य असते.

कोरोना काळाने जगाला दाखवून दिले की आरोग्यसेवेचा सर्वांत सातत्याने धावणारा श्वास म्हणजे परिचारिका.ङ्क संसर्गाची भीती, अपुऱ्या साधनसामग्रीची चिंता, स्वतःच्या कुटुंबापासून दूर राहण्याची वेदना आणि मृत्यूचे रोज समोर दिसणारे भय, या सगळ्यांच्या छायेत हजारो परिचारिका न डगमगता उभ्या राहिल्या. अनेकांनी स्वतःचे आरोग्य धोक्यात घातले, काहींनी प्राणही गमावले. त्या



काळात समाजाने त्यांना टाळ्या वाजवून सलाम केला; पण प्रश्न असा आहे की, संकट ओसरल्यानंतर त्या समर्पणाची आपण कितपत दखल घेतली? आजही अनेक परिचारिका प्रचंड कामाच्या ताणाखाली काम करतात. अनेक रुग्णालयांत कर्मचारी अपुरे असतात, त्यामुळे एका परिचारिकेवर असंख्य रुग्णांची जबाबदारी येते. सलग ड्युटी, रात्रपाळी, भावनिक ताण, संसर्गाचा धोका आणि अनेकदा कमी वेतन, या सगळ्यांमध्ये त्यांची सेवा सुरू असते. समाजाला परिचारिकेकडून करुणा, संयम, तत्परता आणि हसू अपेक्षित असते पण तिच्या थकव्याची, मानसिक ताणाची आणि वैयक्तिक आयुष्याच्या किंमतीची दखल किती जण घेतात?

परिचारिकांविषयी समाजात असलेली काही रूढ प्रतिमाही बदलण्याची गरज आहे. परिचर्या ही केवळ स्त्रियांची सेवा नव्हे तर ती उच्च दर्जाचे प्रशिक्षण, निर्णयक्षमता, निरीक्षणशक्ती आणि वैद्यकीय कौशल्य यांची मागणी करणारे व्यावसायिक क्षेत्र आहे. एखाद्या रुग्णाच्या प्रकृतीत सूक्ष्म बदल ओळखून तातडीने योग्य सूचना देण्याची क्षमता अनेकदा जीव वाचवते. म्हणून परिचारिकेला केवळ 'सहाय्यक' म्हणून पाहणे हे तिच्या भूमिकेचे अवमूल्यन आहे. आरोग्य व्यवस्थेच्या संदर्भात आणखी एक वास्तव विचारात घ्यावे लागेल. मोठमोठी खासगी रुग्णालये, आधुनिक उपकरणे, अत्याधुनिक यंत्रणा आणि चम कदार आरोग्यसेवा यांचा आपण गौरव करतो, पण त्या यंत्रणेच्या केंद्रस्थानी असलेल्या परिचारिकांच्या कामाच्या अटी अनेकदा समाधानकारक नसतात. अनेक ठिकाणी वेतनविषयक असमानता, बढतीची मर्यादित संधी, करार पद्धतीची असुरक्षितता आणि पुरेशा विश्रांतीचा अभाव ही गंभीर वास्तव आहेत.

ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालये, माता-बाल आरोग्य सेवा, लसीकरण मोहिमा आणि जनजागृती अभियानांम ध्ये परिचारिकांचे योगदान तर अधिकच महत्त्वाचे आहे. शहरात सुविधा असतात; गावात अनेकदा साधनसामग्रीही अपुरी असते. अशा परिस्थितीतही दुर्गम भागात सेवा देणाऱ्या परिचारिका केवळ नोकरी करत नाहीत; त्या समाजाच्या आरोग्याची जीवनरेषा सांभाळत असतात. महिलांचे प्रमाण या क्षेत्रात अधिक असल्याने परिचारिकांच्या प्रश्नांकडे लिंग-संवेदनशीलतेने पाहण्याचीही गरज आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, सन्मान, छळापासून संरक्षण, मातृत्वाच्या गरजांची दखल आणि काम-जीवन संतुलन या प्रश्नांवर अजूनही पुरेसे लक्ष दिले जात नाही. करुणा देणाऱ्यांच्या आयुष्यातही करुणेची गरज असते, हे समाजाने विसरू नये.

जागतिक परिचारिका दिन हा केवळ कृतज्ञतेचा दिवस नाही तर तो धोरणात्मक बांधिलकीचा दिवस आहे. आरोग्य व्यवस्थेत पुरेशी मनुष्यबळ भरती, गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण, मानसिक आरोग्य सहाय्य, सुरक्षित कामकाज, योग्य वेतन आणि व्यावसायिक सन्मान यांची हमी देणे ही काळाची गरज आहे. परिचारिकांवर फुलांचा वर्षाव करून गौरव करणे सोपे आहे पण त्यांना न्याय्य व्यवस्था देणे हेच खरे सामाजिक उत्तरदायित्व आहे. या निमित्ताने समाजाने स्वतःलाही काही प्रश्न विचारले पाहिजेत. रुग्णालयात परिचारिकेशी आपण आदराने बोलतो का? तिच्या कामाच्या ताणाची जाणीव ठेवतो का? तिच्या सूचनांचे गांभीर्य समजून घेतो का? सेवा अपेक्षित असते; पण सेवकाचा सन्मान करणे हीही सभ्यतेची कसोटी आहे.

परिचारिका म्हणजे केवळ वैद्यकीय यंत्रणेतील एक घटक नाही. ती वेदनेसमोर धीर देणारा आवाज आहे. ती भीतीसमोर आश्वासक उपस्थिती आहे. ती नवजात बाळाच्या पहिल्या श्वासाची साक्षीदार आहे आणि मृत्यूच्या उंबरठ्यावरच्या शेवटच्या क्षणातही शांततेचा हात धरून उभी असते. माणसाच्या आयुष्यातील सर्वांत असुरक्षित क्षणी जो हात आधार देतो, त्याचे महत्त्व शब्दांत मावणारे नाही. आजच्या स्पर्धात्मक, वेगवान आणि अनेकदा संवेदनाहीन होत चाललेल्या समाजात परिचारिकांचे अस्तित्व आपल्याला एक मूलभूत मूल्य आठवण करून देते, मानवता अजून जिवंत आहे.

औषध उपचार करू शकते, तंत्रज्ञान निदान करू शकते पण मायेचा स्पर्शच अनेकदा जगण्याची उमेद परत आणतो. जागतिक परिचारिका दिनानिमि त्त आपण हा संकल्प करू या, ङ्कपरिचारिकांचा सन्मान केवळ अभिनंदनात नसतो तर तो त्यांच्या कामाच्या अटी, सुरक्षितता आणि न्याय्य वेतनात दिसला पाहिजे.ङ्क त्यांच्या सुरक्षिततेची हमी द्यायची. त्यांच्या व्यावसायिक सन्मानाला सम ाजाच्या केंद्रस्थानी ठेवायचे. कारण शेवटी आरोग्य व्यवस्थेची खरी ताकद केवळ यंत्रांमध्ये नसते; ती त्या निःशब्द, जागत्या डोळ्यांत असते, जे रात्रभर एखाद्या अनोळखी रुग्णासाठी जागत असतात. त्यांच्या मायेचा स्पर्श, त्यांच्या सेवाभावाची ऊब आणि त्यांच्या समर्पणाचा प्रकाश आपल्या समाजाला अधिक मानवी, अधिक संवेदनशील आणि अधिक सशक्त बनवत राहो, हीच कृतज्ञ शुभेच्छा! जागतिक परिचारिका दिनानिमित्त सर्व परिचारिकांना मनःपूर्वक अभिवादन!

**–प्रवीण बागडे**

# सौर कृषिपंप लाभार्थ्यांनी इतरांनाही प्रेरणा द्यावी

## नवीन और नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे सचिव श्री.संतोष कुमार सारंगी यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - विकसित भारतासाठी शेतकरीही विकसित व्हायला हवा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्र सरकारतर्फे सौर कृषिपंपांसह विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे. या योजनांच्या लाभार्थ्यांनी इतर शेतकऱ्यांनाही सौर पंपांचा लाभ घेण्यास प्रोत्साहित करावे, असे आवाहन केंद्र सरकारच्या नवीन और नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे सचिव श्री.संतोष कुमार सारंगी (भाप्रसे) यांनी केले.

शनिवारी (९ मे) महापारेषणच्या सभागृहात पीएम-कुसुम बी व मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या लाभार्थ्यांशी श्री.सारंगी यांनी संवाद साधला. यावेळी राज्याचे नवीन और नवीकरणीय ऊर्जा, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, दिव्यांग कल्याण मंत्री ना.श्री.अतुल सावे, नवीन व नवीकरणीय मंत्रालयाचे सहसचिव श्री.जेव्हीएन सुब्रमण्यम (भाप्रसे), विभागीय आयुक्त श्री.जी. श्रीकांत (भाप्रसे), नवीन और नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या संचालक श्रीमती सुमन चंद्रा (भाप्रसे), जिल्हाधिकारी श्री.विनय गौडा जी.सी. (भाप्रसे), महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री.आदित्य जीवने (भाप्रसे), कार्यकारी संचालक (वितरण) श्री.धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) पंकज तगलपल्लेवार, छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.पवनकुमार कछोट यांची प्रमुख उपस्थिती होती. सचिव श्री.सारंगी, सहसचिव श्री.सुब्रह्मण्यम, संचालक श्रीमती चंद्रा यांनी लाभार्थ्यांशी सौरपंप बसवण्याआधीची व नंतरची स्थिती, पीक पद्धती व उत्पादनात झालेले बदल याविषयी संवाद साधला. छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड जिल्ह्यातील लाभार्थी अंकुश बर्गे, वैशाली लहाने, बळीराम लहाने, सचिन जोशी, गजानन शिंदे, विजय जावळे यांनी सौर ऊर्जेमुळे आयुष्यात परिवर्तन झाल्याचे सांगितले. आधी वीज नसल्याने डिझेलपंप लावून पिकांना पाणी द्यावे लागायचे. त्यासाठी दिवसाकाठी ७०० ते ८०० रुपये डिझेलला खर्च व्हायचे. मात्र शासनाकडून अनुदानावर सौर कृषिपंप मिळाल्याने डिझेलचा खर्च वाचला आहे. दिवसा खात्रीशीर वीज मिळत असल्याने नगदी पिके घेतली आणि उत्पन्नात वाढ झाली, असे लाभार्थ्यांनी सांगितले. व्यवसायाने विद्युत अभियंता असलेले सचिन जोशी यांनी सौरपंप बसवल्यानंतर शेतीत भरघोस उत्पादन होत असल्याचे सांगितले. आधी कोरडवाहू शेती होती. तेव्हा एकच पिक होते. मात्र सौरपंप बसवल्यानंतर भाजीपाला, फळे लागवड केल्याने उत्पन्न वाढले. या योजनेचा लाभार्थी म्हणून राष्ट्रपती भवनात जाण्याचीही संधी मिळाली, असे बळीराम लहाने यांनी सांगितले. सौर पंप योजनेत ग्राहकांना सुलभरीत्या लाभ मिळवा यासाठी महावितरणतर्फे करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची माहिती अधीक्षक अभियंता संजय सरग यांनी दिली. अर्ज करण्यापासून ते पंप बसवण्यापर्यंत मानवी हस्तक्षेप टाळून महावितरणकडून पारदर्शक पद्धतीने सर्व प्रक्रिया होते. त्यामुळे महाराष्ट्रात या योजनेला यश मिळाल्याचे श्री.सरग यांनी सांगितले.



यावेळी सचिव श्री. संतोष कुमार सारंगी म्हणाले, कुसुम बी व मागेल त्याला कृषी पंप योजनेचा लाभ झाल्याचे जेव्हा शेतकरी सांगातात, तेव्हा या योजनेचा उद्देश सफल झाल्याचे समाधान वाटते. स्वातंत्र्यानंतर शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना आल्या. मात्र त्या सर्वांत फायदेशीर ही सौर कृषी पंप योजना आहे. कारण याचा शेतकऱ्यांना थेट लाभ होत आहे. ज्या शेतकऱ्यांना पंप मिळाल्यानंतर त्यांचे जीवनमान सुधारले, त्यांनी इतर शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ घेण्यास प्रेरित करावे, असे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्रात सौर पंप योजना यशस्वीपणे राबवल्याबद्दल श्री.सारंगी यांनी महावितरणचे अभिनंदन केले. केंद्र सरकारतर्फे आता पीएम-कुसुमअंतर्गत ॲग्री फोटो व्होल्टाइक योजना राबवण्यात येणार आहे. त्यात सौर पॅनल शेतात विशिष्ट उंचीवर बसवून पॅनलखालील भूभागही पिकांच्या लागवडीसाठी वापरता येणार आहे. पॅनलच्या सावलीत भाजीपाला चांगला पिकवता येतो. देशात काही ठिकाणी असे पॅनल बसवण्यात आल्याचे सचिव श्री.सारंगी यांनी सांगितले. कार्यकारी संचालक श्री.धनंजय औंढेकर यांनी प्रास्ताविक केले. ॲड.युगंधरा नामदे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्य अभियंता श्री.पवनकुमार कछोट यांनी आभार मानले. अधीक्षक अभियंता संदीप दरवडे, प्रेमसिंग राजपूत यांनी स्वागत केले.

सौर कृषी वाहिनी प्रकल्प व सौरपंपाची पाहणी- नवीन और नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे सचिव श्री. संतोष कुमार सारंगी यांनी सिल्लोड तालुक्यातील वरखेडी येथील ६ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पाचीही पाहणी केली. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत कार्यान्वित करण्यात आलेल्या या प्रकल्पातून आळंद उपकेंद्रावरील ३ हजार १४८ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा केला जातो. याबाबत श्री.सारंगी व त्यांच्या सहकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. या पथकाने फुलंब्री तालुक्यातील उमरावती येथील शेतकरी आरिफ हुसेन सय्यद यांच्या शेतातील सौर पंपाची पाहणी केली. ५ एचपी क्षमतेच्या पंपामुळे शेती सिंचन सोयीचे झाल्याचे यावेळी शेतकऱ्याने सांगितले.

# अखिल भारतीय औषध विक्रेत्यांचा दि.२० मे २०२६ रोजी देशव्यापी बंद



छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने (AIOCD) बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री तसेच कंपन्यांद्वारे अव्यावसायिक स्पर्धेविरोधात दि. २० मे २०२६ रोजी औषध विक्रेत्यांचा बंद पुकारला आहे.

औषधी व्यवसाय हा Drugs and Cosmetics Act 1940 व Rule 1945 अंतर्गत चालवला जातो. ऑनलाईन औषध विक्रीबाबत Drugs and Cosmetics Act मध्ये कोणतीही तरतूद नाही. केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन औषध विक्रीबाबत GSR 817(E) दि. 28.08.2018 अंतर्गत नोटिफिकेशन जारी केले होते. परंतु त्याचे अध्यादेश कायद्यात रूपांतर झालेले नसल्यामुळे देशभरात सर्वच प्रकारची बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री सुरू आहे. याबाबत मा. दिल्ली उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल असून मा. दिल्ली उच्च न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीवर स्थगिती देण्याचे निर्देश दिले आहेत. याकडेही सरकार दुर्लक्ष करीत आहे.

संघटनेने सदरचे जीएसआर रद्द करण्याची मागणी केली आहे.अशी माहिती आज पत्रकार परिषदेमध्ये दि औरंगाबाद केमिस्ट अंड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष श्री. नितिन हरिश्चंद्र देशमुख (दांडगे), सचिव विनोद रुपचंद लोहाडे, उपाध्यक्ष शहर श्री.नंदकिशोर सर्जेराव काळे, सह-सचिव शहर श्री. किरण विठ्ठलराव जोशी, सह-सचिव ग्रामीण श्री.सुनील प्रभाकरराव देशमुख यानी दिली

कोरोना काळात GSR 220(E) दि. २६.०३.२०२० नुसार सरकारने औषधांची होम डिलिव्हरी देण्याबाबत विशेष सूट दिली होती. कोरोना संपून पाच वर्षे उलटल्यानंतरही सदरचे नोटिफिकेशन कायमस्वरूपी रद्द करण्यात आलेले नाही. याचा गैरफायदा घेऊन ऑनलाईन कंपन्या स्वतःचे भांडार उभारून औषध विक्रीचा व्यवसाय करीत आहेत तसेच कंपन्यांकडून अव्यावसायिक स्पर्धा निर्माण केली जात आहे. त्यामुळे अनेक छोटे व्यावसायिक अडचणीत येत असून ग्रामीण भागातील औषधी वितरण व्यवस्था धोक्यात येऊ शकते.

जगन्नाथ शिंदे पुढे म्हणाले की, सरकारने Drug Price Control Order (DPCO) 2013 या कायद्यानुसार चरर्पीषरर्लीीशी कडून काही जीवनावश्यक औषधीवर ८% होलसेलरला व १६% रिटेलरला व अनियंत्रित औषधीवर १०% होलसेलर व २०% रिटेलरला नफा देण्यात येतो. याउलट कंपन्या आपल्या भागभांडवल वाढवण्यासाठी २०% ते ४०% डिस्काउंट देतात. त्यामुळे संपूर्ण देशातील १२.५० लाख औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात येऊन बंद होण्याच्या मार्गावर आहे. यामुळे सरकारने Drug Price Control जीवशी (DPCO) 2013 अंतर्गत 16% नफा नियंत्रित केलेला नफा व्यवसायात टिकवून ठेवण्यासाठी तसेच औषध विक्रेत्यांना डॉक्टरांच्या औषधांऐवजी अन्य Brand substitute औषधी देण्याचा अधिकार दिल्यास औषध विक्रेते ही स्पर्धेला उत्तर देऊ शकणाऱ्या कंपन्यांसोबत लढा देऊ शकतील.

एआयओसीडीचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे की, केंद्र शासनाने संबंधित विभागाचे मंत्री तसेच संबंधित प्रशासकीय अधिकारी यांना वारंवार निवेदने देऊन तसेच प्रत्यक्ष भेटीसाठी वेळ मागूनही सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर संघटनेने मा. श्री. नरेंद्रजी मोदी - पंतप्रधान यांनाही निवेदन देऊन याकडे लक्ष देण्याची विनंती केली. त्यासही प्रतिसाद न मिळाल्यामुळे संघटनेने आंदोलनात्मक भूमिका घेतली व त्याअंतर्गत झालेल्या निर्णयानुसार दि. २० मे २०२६ रोजी अखिल भारतीय औषध विक्रेत्यांचा बंद पुकारण्यात आला आहे.

राज्यसंघटनेचे सचिव अनिल गावंडे यांच्यासह छत्रपती सभाजीनगरचे श्री.नितिन हरिश्चंद्र देशमुख (दांडगे), श्री. विनोदकुमार रुपचंद लोहाडे, श्री.निखील सुनील सारडा, श्री.नंदकिशोर सर्जेराव काळे, श्री. सागर साहेबराव पाटील, श्री. किरण विठ्ठलराव जोशी, श्री.सुनील प्रभाकरराव देशमुख, श्री. बाबुराव धोंडीबा सोनवणे, श्री. कपिल राजकुमार टिबडीवाला, श्री.शेख अब्दुल रईस अब्दुल वहाब, वसंत नारायण भराड, श्री. हरीष भगवान काबरा, श्री.सचिन सुरेशकुमार मुगदिया, श्री.प्रभू कचरू गिरी, श्री. सुरेश प्रभाकर बोरसे, श्री.अशोक बाबासाहेब धस, श्री. प्रवीण कमलकिशोर तिवारी, देवीदास मुरलीधर मगर. सर्व कार्यकारिणी तसेच मराठवाडा झोन चे अध्यक्ष श्री. सय्यद इजान व महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिल चे सदस्य श्री. मनोहर कोरे यांनी सदरचे बंद महाराष्ट्र राज्यात १००% यशस्वी होईल यासाठी संपूर्ण समाजबांधव 'बंदच्या' मानसिकतेत असल्याचे स्पष्ट केले. ते पुढे असेही म्हणाले की, लोकशाही मार्गाने केलेल्या प्रयत्नांना सरकारकडून योग्य व सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे सभासदांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. राज्यसंघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी स्पष्ट केले की, सरकारने आमच्या मागण्यांवर न्याय भूमिका न घेतल्यास आंदोलनाच्या पुढील टप्प्यात होणाऱ्या गैरसोयींना संपूर्णपणे सरकार जबाबदार राहील.

# सेवन हिल अतिक्रमण निर्मूलन कारवाई: चुकीचा व्हिडिओ व्हायरल करणाऱ्यांवर मनपा गुन्हा दाखल करणार

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - मागील आठवड्यात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत सेवन हिल ते शाहनूरमिया दर्गा चौक परिसरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली होती. या कारवाईदरम्यान सेवन हिल परिसरातील फ्रान्सिलियन शाळा तसेच शासकीय कार्यालयासमोरील फुटपाथवर माठ विक्रेत्यांनी केलेले अतिक्रमण हटविण्यात आले. या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना तसेच वाहतुकीला मोठ्या प्रमाणावर अडथळा निर्माण होत होता.

मात्र, या कारवाईची बदनामी करण्याच्या उद्देशाने सोशल मीडियावर एक चुकीचा व्हिडिओ व्हायरल करण्यात आला. सदरील व्हिडिओमध्ये एका दिव्यांग महिलेला फुटलेले माठ उचलताना दाखवून, तिचा उदरनिर्वाह माठ विक्रीवर अवलंबून होता आणि महानगरपालिकेने तिच्यावर अन्याय केल्याचा चुकीचा संदेश प्रसारित करण्यात आला.

आज छत्रपती संभाजीनगर म हानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे आणि अतिक्रमण विभागाचे नियंत्रण अधिकारी श्री. संतोष वाहुळे यांनी प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी संबंधित दिव्यांग महिलेशी संवाद साधण्यात आला असता, तिचा माठ विक्री व्यवसायाशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट झाले. तिचा संबंध नसतानाही तिचा वापर करून दिशाभूल करणारा व्हिडिओ प्रसारित करण्यात आल्याचे समोर आले आहे. दिव्यांग महिलेच्या बहिण व आई यांनी या चुकीच्या व्हायरल व्हिडिओ बाबत संताप देखील व्यक्त केला आहे.

सदरहू दिव्यांग महिला गजानन महाराज मंदिर परिसरात भिक्षा मागून उदरनिर्वाह करते. या प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया महानगरपालिकेकडून सुरू करण्यात येणार आहे.

**दिव्यांग महिलेला मिळणार उदरनिर्वाह भत्ता**

सदरहू दिव्यांग महिला गजानन महाराज मंदिर परिसरात भिक्षा मागून उदरनिर्वाह करते. याची नोंद घेऊन आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी महानगरपालिकेतर्फे दिव्यांग नागरिकांसाठी देण्यात येणाऱ्या उदरनिर्वाह भत्ता योजनेत तिचे नाव समाविष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे संबंधित महिलेला दरमहा सुमारे साडेतीन हजार रुपयांचा भत्ता मिळणार असून तिला रस्त्यावर भीक मागण्याची गरज भासणार नाही.

# छत्रपती संभाजीनगरच्या सेंट जॉन्स विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा राखली कायम

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - सेंट झेवियर्स ग्रुप ऑफ स्कूल्सची शाखा असलेल्या पैठण रोड येथील सेंट जॉन्स हायस्कूलने मार्च २०२६ मध्ये झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पुन्हा एकदा विद्यालयाचा गौरव वाढवला आहे. विद्यालयाने १०० टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत शैक्षणिक उत्कृष्टतेचा मान उंचावला आहे. विद्यालयातील ९ हून अधिक विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले असून, ६० टक्के विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, २० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर ५टक्के विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी मिळवली आहे.




सेंट झेवियर्स ग्रुप ऑफ स्कूल्सचे चेअरमन डॉ. ए. एफ. पिंटो तसेच व्यवस्थापकीय संचालिका डॉ. ग्रेस पिंटो यांनी विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल आणि यशस्वी भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत : मास्टर वरद व्यवहारे (९४.२०), कु. अमन शेख (९३.२०), कु. एंजल घुले (९२.२०), कु. तनुश्री हिवराळे (९१.२०), कु. प्राची नरवडे (९१.००), मास्टर आयुष छत्रबंध (९०), मास्टर सत्यम सूर्यवंशी (९०), मास्टर आर्यन देवगिरकर (९०) आणि कु.अवनी कुलकर्णी (९०). मास्टर वरद व्यवहारे यांनी विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर सहशालेय उपक्रमांमध्येही प्रगती करण्यासाठी सतत प्रेरणा दिल्याबद्दल सेंट झेवियर्स ग्रुप ऑफ स्कूल्सप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तसेच चेअरमन डॉ. ए. एफ. पिंटो यांच्या '१२ व्हिजन पॉइंट्स' मुळेच उत्कृष्ट यश मिळिवण्यास प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. विद्यालयाच्या प्राचार्यांनी व्यवस्थापन, पालक आणि शिक्षकवृंद यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. तसेच विद्यार्थ्यांना व्यवस्थापकीय संचालिका डॉ. ग्रेस पिंटो यांच्या प्रेरणादायी संदेशानुसार जीवनात सतत प्रगती करत राहण्याचा सल्ला दिला.

# कडेठाण बु. येथे अवैध दारू विक्रीविरोधात सामाजिक कार्यकर्ते अतुल बापु तवार पाटील यांचा लढा कायम

कडेठाण बु. ता. पैठण दि. ११ (प्रतिनिधी) - कडेठाण बु. येथील सामाजिक कार्यकर्ते अतुल बापु तवार पाटील गेल्या दोन वर्षांपासून गावातील अवैध दारू विक्रीविरोधात सातत्याने लढा देत आहेत. गावातील युवकांचे भवितव्य सुरक्षित राहावे तसेच अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होण्यापासून वाचावेत, या उद्देशाने त्यांनी प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊन कारवाईची मागणी केली आहे.



गावातील खंडोबा मंदिर परिसरात तसेच दोन्ही बाजूंना जिल्हा परिषद शाळा आणि आपले विद्यालय कडेठाण हायस्कूल असलेल्या परिसरात अवैध दारू विक्री सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे. शाळा आणि धार्मिक स्थळाजवळ सुरू असलेल्या या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. यासाठी अनेक वेळा ग्रामसभा घेऊन ठराव मंजूर करून पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

अवैध दारूमुळे अनेक सुखी संसार उध्वस्त झाले असून काही कुटुंबे अजूनही संकटाच्या उंबरठ्यावर आहेत. विशेषतः तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत असल्याने गावकऱ्यांनीही चिंता व्यक्त केली आहे.

सामाजिक कार्यकर्ते अतुल बापु तवार पाटील यांनी प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करून गावातील अवैध दारू विक्री कायमस्वरूपी बंद करावी, अशी मागणी केली आहे. तसेच गावातील नागरिकांनीही या सामाजिक लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात १५२४ प्रकरणे तडजोडीने निकाली;२३ कोटी ३२ लाख वसुली

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, राज्य विधी सेवा प्राधिकअण यांच्या आदेशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने शनिवारी (दि.९) आयोजीत राष्ट्रीय लोकअदालत मध्ये प्रलंबित व वादपूर्व असे एकूण १५२४ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली. याद्वारे २३ कोटी ३२ लक्ष ७२ हजार ४०५ रुपये रकमेचा समावेश असलेली प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली,असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती वैशाली फडणीस यांनी कळविले आहे.

प्रलंबित व वादपूर्व प्रकरणांच्या राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन शनिवार दि.९ रोजी करण्यात आले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश गिरीश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन करण्यात आले. त्यात विविध शासकीय विभाग, वीज कंपनी, विधीज्ञ, सरकारी वकील, वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी इ. सहभाग घेतला. या लोकअदालतीत १४७१ प्रलंबित व ५३ दाखलपूर्व असे एकूण १५२४ प्रकरणांम ध्ये तडजोड झाली. त्यात प्रलंबित प्रकरणांमध्ये २२ कोटी ३६ हजार ३४० रुपये रक्कम वसुली झाली. तर दाखलपूर्व प्रकरणांमध्ये १ कोटी ३२ लाख ३६ हजार ६५ रुपये असे एकूण २३ कोटी ३२ लाख ७२ हजार ४०५ रुपये एवढ्य रकमेचा समावेश असलेली प्रकरणे निकाली निघाली. राष्ट्रीय लोकअदालतीसाठी जिल्ह्यात एकूण ३४ पॅनल तयार करण्यात आले होते,असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती वैशाली फडणीस यांनी कळविले आहे.

# प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना प्रभावी अंमलबजावणीसाठी समन्वय राखावा- जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजने अंतर्गत देशातील १०० आकांक्षित जिल्ह्यात राज्यातील ९ जिल्ह्यांचा समावेश असून त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्हाही समाविष्ट आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज येथे दिले.

प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात शुक्रवारी (दि.८) जिल्हा कृती समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. सहा. जिल्हा जलसंधारण अधिकारी ए.बी. शेख, प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आनंद गंजेवार, सहा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. रमण इंगळे, जिल्हा उपायुक्त डॉ. एन.एस. कदम, कृषी विज्ञान केंद्र संचालक डॉ. दीप्ती पाटगावकर, चंदहार ढोकणे, वरिष्ठ शास्त्रज्ञ के.ए. सुकाणे, विलास कोळेकर तालुका उपनिबंधक, प्रभारी सहा. आयुक्त मत्स्य व्यवसाय उषा पवार, सहा. आयुक्त कौशल्य विकास आर.एन. वाकुडे आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश असून त्यात कृषी उत्पादकता वाढविणे, पीक विविधीकरण, पीक घनतेत वाढ, नैसर्गिक व सेंद्रीय शेतीला चालना, पाणी व्यवस्थापन, पीक काढणी पश्चात साठवणूक आणि मूल्यवर्धन, दीर्घ व अल्प मुदतीच्या कर्जाची सुविधा अशा पद्धतीच्या उपाययोजनांद्वारे कृषी विकास योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत कृषी व फलोत्पादन, कृषी संशोधन व शिक्षण, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, सहकार विभाग, जलसंपदा, उद्योग, ग्रामविकास, भूजल संचालनालय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभाग अशा ११ विभागांच्या योजनांच्या अभिसरणातून जिल्हा कृती आराखडा तयार करुन योजना राबविण्यात येत आहे.

संबंधित विभागांनी आपल्या विभागामार्फत राबवावयाच्या उपाययोजना, अंम लबजावणीचे टप्पे, त्यातून साध्य करावयाची उद्दिष्टे याबाबींचा वस्तूनिष्ठ अंतर्भाव करावा.

कौशल्य प्रशिक्षण आणि कृषी पूरक उद्योग यांची सांगड, अन्न प्रक्रिया उत्पादने याबाबींची मूल्यवर्धित साखळी तयार करण्यासाठी शेतकरी प्रशिक्षण इ. निकषांवर अधिक कार्य करावे. जिल्ह्यातील कृषी क्षेत्राचा विकास होऊन जमिनीची उत्पादकता ते नैसर्गिक शेतीला चालना अशा विविध घटकांचा विकास याद्वारे करता येणार आहे.

शेतकरी व कृषी आधारीत व्यवसायांचा विकास होण्यासाठी या योजनेच्या प्रभावी अंम लबजावणीसाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय राखून उपाययोजना राबवाव्या असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.

# उपवास हा आत्मशुद्धी आणि संयमाचा महापर्व- अंतर्मना आचार्य प्रसन्न सागर महाराज

## 'दर महिन्याला एक उपवास' महाअभियानात तप-संयमाचा संकल्प

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - परतापूर, नगरातील नेमिनाथ दिगंबर जैन मंदिरात विराजमान असलेल्या अहिंसा संस्कार पदयात्रेचे प्रणेते, अंतर्मना आचार्य प्रसन्न सागर महाराज ससंघ यांच्या सान्निध्यात सुभाषचंद्र बोस स्टेडियममध्ये 'दर महिन्याला एक उपवास' महाअभियान आणि जैन मंगल महोत्सवाचा भव्य कार्यक्रम श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात हजारो श्रद्धाळूंची अभूतपूर्व उपस्थिती लाभली आणि संपूर्ण परिसर धर्ममय झाला.






विशाल धर्मसभेत आचार्यश्रींच्या ओजस्वी आणि प्रेरणादायी प्रवचनांनी प्रभावित होऊन शेकडो श्रद्धाळूंनी दर महिन्याला एक उपवास करण्याचा संकल्प स्वीकारला. संपूर्ण स्टेडियम नवकार महामंत्र, जयघोष आणि धर्मजयकारांनी दुमदुमून गेले.

आचार्यश्री म्हणाले की, उपवास हा केवळ अन्नत्याग नसून आत्म्याची शुद्धी, मनाची पवित्रता आणि संयमाचा महोत्सव आहे. आजचा मानव भौतिक सुखांच्या मागे धावताना मानसिक अशांततेने ग्रासला जात आहे, तर तप, त्याग आणि साधना यांमुळेच जीवनात खरी शांती आणि आत्मिक आनंद प्राप्त होतो. प्रत्येक व्यक्तीने महिन्यातील फक्त एक दिवस जरी धर्म आणि तपासाठी समर्पित केला, तरी समाज आणि कुटुंबात सकारात्मक परिवर्तन निश्चित घडेल. कार्यक्रमांतर्गत जनमंगल महोत्सव, मंत्रस्नान आणि जलयज्ञ यांसारख्या धार्मिक विधींचे आयोजन विश्वशांती, मानवकल्याण आणि जनमंगलाच्या भावनेतून करण्यात आले. श्रद्धाळूंनी अत्यंत श्रद्धा आणि भक्तिभावाने या विधींमध्ये सहभाग घेतला.

प्रवक्ते राहुल जैन यांनी सांगितले की, अंतर्मना आचार्य प्रसन्न सागर महाराज यांच्या आवाहनानुसार 'दर महिन्याला एक उपवास' महाअभियान प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला आयोजित केले जाते. या अभियानाशी देश-विदेशातील सुमारे १२ कोटी लोक जोडले गेले आहेत. हे अभियान केवळ धार्मिक कार्यक्रम नसून आत्मशुद्धी, संयम आणि संस्कार जागृतीचे जागतिक आंदोलन बनले आहे.

कार्यक्रमात हीलिंग कल्पवृक्ष हीलिंग फाउंडेशनच्या प्रियंका दीदी शाह यांनी आध्यात्मिक हीलिंग सत्र घेतले, ज्यामुळे उपस्थित श्रद्धाळूंना विशेष आध्यात्मिक अनुभूती मिळाली. दिशी जैन यांच्या मधुर संगीताने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले.

कार्यक्रमाचे संचालन नेमिनाथ नवयुवक मंडळाचे अध्यक्ष चिराग दोसी यांनी केले. महिला, युवक आणि मुलांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. मोठ्या संख्येने श्रद्धाळूंनी धर्मप्रभावनेचे हे महाअभियान घराघरांत पोहोचवण्याचा तसेच समाजात तप, त्याग आणि संस्कारांची ज्योत प्रज्वलित ठेवण्याचा संकल्प केला. संपूर्ण कार्यक्रमस्थळ आकर्षक फुले, धार्मिक ध्वज आणि भव्य सजावटीने सजविण्यात आले होते. शिस्त, श्रद्धा आणि भक्तीचा अद्भुत संगम संपूर्ण कार्यक्रमात अनुभवायला मिळाला. शेवटी मंगल आरती, धर्मलाभ आणि आचार्यश्रींच्या मंगल आशीर्वादाने कार्यक्रमाची सांगता झाली. ही माहिती प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, छत्रपती संभाजीनगर रोमिल पाटणी आणि यांनी दिली.

# 'जय श्रीराम'च्या जयघोषाने करवीरनगरीत रामराज्याचा जागर : विविध संप्रदाय, आध्यात्मिक संस्था यांचा सहभाग

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या ८४ व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने कोल्हापुरात भव्य हिंदू एकता दिंडी !**

कोल्हापूर, दि. ११ (प्रतिनिधी) - सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या ८४ व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने संस्थेच्या वतीने देशभरात 'राम राज्य निर्माण अभियान' राबवण्यात येत आहे. त्या निमित्ताने साडेतीन शक्तीपिठांपैकी एक असलेल्या आणि श्री महालक्ष्मी देवीच्या कृपेने पावन झालेल्या करवीर नगरीत १० मे २०२६ या दिवशी भव्य अशा हिंदू एकता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीच्या माध्यमातून रामराज्य म्हणजेच हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचे स्फुल्लिंग चेतवले गेले.

या फेरीत वारकरी संप्रदाय, श्री संप्रदाय, 'भागिरथी महिला मंच', श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, 'इस्कॉन', भजनी मंडळ, भाजप, शिवसेना, पतित पावन संघटना, विश्व हिंदु परिषद, बजरंग दल, हिंदु महासभा, चिन्मय मिशन, कोल्हापूर जिल्हा ब्राह्मण पुरोहित संघ यांसह विविध संप्रदाय, आध्यात्मिक संस्था यांसह मोठ्या संख्येने हिंदू सहभागी होते. या फेरीसाठी सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये आणि पू. (कु.) दीपाली मतकर यांची वंदनीय उपस्थिती होती.

मिरजकर तिकटी येथे प्रसिद्ध व्यावसायिक श्री. जयंतीभाई पटेल यांच्या हस्ते धर्मध्वजाचे पूजन करण्यात आले. यानंतर मान्यवरांच्या हस्त सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले, श्री महालक्ष्मीदेवी आणि श्री जोतिबा देव यांच्या पालखीचे पूजन करण्यात आले. दिंडीत चारचाकी वाहनात असलेली छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिंडीचा उद्देश स्पष्ट केला. मिरजकर तिकटी, खरी कॉर्नर, महाद्वार रोड, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (शिवतीर्थ) येथे दिंडीची सांगता झाली.

दिंडीच्या समोर धर्मध्वज होता, तर मागे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे छायाचित्र, श्री महालक्ष्मी देवी आणि श्री जोतिबा देव यांचे छायाचित्र असलेली पालखी होती. दिंडी जात असतांना वाटेत धर्मध्वजाची आरती ओवाळून, तसेच पुष्पवृष्टी करून अनेकांनी स्वागत केले.

**'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे धर्मसेवकांना म ार्गदर्शन', या ग्रंथाचे प्रकाशन !**

समारोपप्रसंगी सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये, श्री. अभय वर्तक, तसेच आरोग्यभारतीच्या वैद्या अश्विनी माळकर यांनी उपस्थितांना संबोधित केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे धर्मसेवकांना म ार्गदर्शन', या मराठी भाषेतील ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

**क्षणचित्रे**

१. 'सव्यासाची गुरुकुलम' यांनी सादर केलेल्या चित्तथरारक अशा शिवकालीन युद्धकलांचे सादरीकरणाने तेजस्वी शिवकालाचे स्मरण झाले. या वेळी लव्ह जिहादची भयावहता दाखवणारा देखावा सादर करण्यात आला.

२ मर्दानी खेळांचे पथक, लेझिम पथक, 'गदा पथक', 'शाहिरी पथक',बासरी पथक, वानर सेना पथक, ढोलपथक, प्रथमोपचार पथक, लाठीकाठीची प्रात्यक्षिके दाखवणारे 'रणरागिणी' पथक, टाळ-मृदंग घेतलेले वारकरी पथक अशा ५० प्रकारच्या विविध पथकांचा दिंडीत समावेश होता. यांच्या सहभागाने दिंडीतील वातावरण चैतन्यमय झाले होते.

३. नऊवारी साडी परिधान केलेल्या कलशधारी महिला, पारंपारिक वेशात सहभागी झालेले साधक, स्वरक्षणाची प्रात्यक्षिके सादर करणारे क्षात्रवीर दिंडीत सहभागी होते.

४. दिंडीतील वारकऱ्यांच्या 'राम कृष्ण हरि'च्या जयघोषाने कोल्हापूरकरांनी आध्यात्मिक रसाची गोडी अनुभवली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# सोमनाथ मंदिर देशाच्या आत्म्याचे प्रतीक-राज्यपाल जिष्णु देव वर्मा

## 'सोमनाथ स्वाभिमान पर्व-अतूट आस्थेचे १००० वर्षी' या विशेष भक्तिपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

मुंबइ दि.११ (प्रतिनिधी)- 'सोमनाथ मंदिर हे केवळ एक मंदिर नसून भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि सनातन परंपरेच्या आत्म्याचे प्रतीक आहे. हजारो वर्षांच्या आक्रमणांनंतरही सोमनाथ मंदिर आजही दिमाखात उभे आहे, हीच भारताच्या सनातन शक्तीची साक्ष आहे,' असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

गुजरात येथील सोमनाथ मंदिरांच्या पुनर्बांधणीस ७५ वर्षे पूर्ण झाली असल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ मे रोजी प्रभास पाटण येथे विशेष महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. याच अनुषंगाने भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि परंपरेचा जागर घडवणारा सांस्कृतिक सोहळा 'सोमनाथ स्वाभिमान पर्व – अतूट आस्थेचे १००० वर्ष या विशेष भक्तिपूर्ण कार्यक्रमाचे सांस्कृतिक कार्य विभागामार्फत श्री धाकलेश्वर महादेव मंदिर, मुंबई येथे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा बोलत होते. यावेळी इलेक्ट्रानिक,



माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता तथा सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार, राज्यपाल यांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे, मंदिराचे व्यवस्थापकीय विश्वस्त अशोक भन्साळे यांनीही महादेवाचे दर्शन घेतले. यानंतर मान्यवरांनी 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' प्रदर्शनालाही भेट दिली.

सोमनाथ मंदिराच्या पुनर्स्थापनेच्या ७५ वर्षानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांना संबोधित करताना राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी सोमनाथ मंदिराच्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्वावर प्रकाश टाकला. महमूद गझनीपासून औरंगजेबापर्यंत अनेक परकीय आक्रमकांनी मंदिर उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला, मात्र मंदिराचे अस्तित्व आणि त्यामागील श्रद्धा कधीही नष्ट होऊ शकली नाही, असे त्यांनी सांगितले. 'भारत हा केवळ भौगोलिक देश नसून तर तो एक चिरंतन संस्कृती आहे. विविध मंदिरे, साधू-संत आणि सनातन परंपरेमुळे भारताचा आत्मा आजही जिवंत आहे. 'सनातन' म्हणजे ज्याचा अंत नाही आणि सोमनाथ मंदिर हे त्याचे जिवंत उदाहरण आहे,' असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रसिद्ध ओडिसी नृत्यांगना शुभदा वराडकर यांच्या नृत्याविष्काराने झाली. भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि परंपरेचा समृद्ध आविष्कार त्यांच्या सादरीकरणातून अनुभवायला मिळाला. सादर झालेल्या नृत्याविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# कर थकबाकी वसुलीसाठी प्रत्येक झोनमध्ये १०० मालमत्तांची यादी तयार करा-आयुक्त अमोल येडगे

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- प्रत्येक सहाय्यक आयुक्तांनी त्यांच्या संबंधित झोनमधील वसुलीयोग्य १०० कर थकबाकीदार मालमत्तांची यादी तयार करून कर वसुलीसाठी विशेष पाठपुरावा करावा, असे निर्देश छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी आज दिले.

आज दुपारी २ वाजता कर वसुलीबाबतचा आढावा त्यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतल ा. यावेळी त्यांनी सर्व सहाय्यक आयुक्तांना विविध सूचना केल्या. प्रत्येक सहाय्यक आयुक्तांनी त्यांच्या वार्डातील वसुलीयोग्य १०० मालमत्तांची यादी तयार करून संबंधित माल मत्ताधारकांकडून थकीत कर वसूल करण्यासाठी वैयक्तिक लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले. तसेच मोठ्या थकबाकीदारांकडून कर वसुल ीसाठी संबंधित सहाय्यक आयुक्तांनी स्वतः पाठपुरावा करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कर आकारणी न झालेल्या किंवा कर न भरणाऱ्या मालमत्ताधारकांचा शोध घेऊन कर आकारणी करावी अथवा कर वसुली करावी, असे निर्देश यापूर्वीही देण्यात आले आहेत. याशिवाय 'माझा कर, माझी जबाबदारी' या मोहिमेंतर्गत थकबाकीसह एकरकमी कर भरणाऱ्यांना व्याजावर १० टक्के सवलत देण्यात येत आहे.

आयुक्तांनी अशा मालमत्तांचा शोध घेण्यासाठी, ज्यांची कर आकारणी झालेली नाही किंवा संबंधित मालक कर भरत नाहीत, प्रत्येक झोनमध्ये बिल कलेक्टर आणि पथक प्रमुखांची नियुक्ती केली आहे. संबंधित बिल कलेक्टर आणि पथक प्रमुखांनी दररोज किमान ५० मालमत्तांना भेट देऊन पाठपुरावा करणे गरजेचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

एका महिन्याच्या आत नेमून दिलेल्या सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच सर्व सहाय्यक आयुक्तांनी श्रीमित्र डॅशबोर्डवर बिल कलेक्टरांनी किती मालमत्तांना भेट दिली, किती कर आकारणी झाली आणि किती कर वसुली झाली यावर सातत्याने लक्ष ठेवावे, असे सांगितले.

पुढील बैठकीत कर वसुलीचे आकडे वाढलेले दिसले पाहिजेत, असे स्पष्ट करत चांगले काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर संदेश द्यावेत, तर उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्यांवर सतत लक्ष ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सर्वात कमी मालमत्तांचे सर्वेक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात बडतर्फीची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आयुक्तांनी यावेळी दिला. या आढावा बैठकीस अतिरिक्त आयुक्त श्रीमती कल्पिता पिंपळे, उपआयुक्त श्री विकास नवाळे उपस्थित होते, तर सर्व सहाय्यक आयुक्त ऑनलाइन माध्यमातून सहभागी झाले होते.

# विभागीय लोकशाही दिनात २ प्रकरणे निकाली

## सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी १५ मेपर्यंत स्व-जनगणना पूर्ण करावी- अपर आयुक्त डॉ. प्रताप काळे

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- अपर आयुक्त डॉ. प्रताप काळे यांनी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना भारतीय जनगणनेअंतर्गत अधिकृत संकेतस्थळावर स्व-जनगणना १५ मेपर्यंत पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. तसेच विभागीय लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणांवर संबंधित विभागांनी नियमांनुसार कार्यवाही करून अहवाल सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.



छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विभागीय लोकशाही दिनात मागील महिन्यातील सहा आणि नव्याने दाखल एका अशा एकूण सात प्रकरणांवर सुनावणी झाली. त्यापैकी दोन प्रकरणे निकाली काढण्यात आली असून पाच प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत.

या बैठकीस तहसीलदार (साप्रवि) के. के. भदाने, नायब तहसीलदार गजानन नांदगावकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ. काळे म्हणाले की, जिल्हास्तरावरील ल ोकशाही दिनात न सुटलेले अथवा तक्रारदाराचे समाधान न झालेली प्रकरणे विभागीय स्तरावर दाखल केली जातात. विभागीय लोकशाही दिनात निर्णय दिल्यानंतरही अनेकदा क्षेत्रीय कार्यालयांकडून त्याची अंमलबजावणी वेळेत होत नाही किंवा संबंधित अर्जदाराला माहिती दिली जात नाही, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे सर्व विभाग प्रमुखांनी विभागीय स्तरावरील निर्णयांची गांभीर्याने अंमलबजावणी करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

तसेच क्षेत्रीय स्तरावर नागरिकांच्या अर्जांवर वेळेत मार्गदर्शन व योग्य तो निर्णय न झाल्याने नागरिकांना विभागीय स्तरावर धाव घ्यावी लागते. त्यामुळे नागरिकांचा नाहक त्रास होतो. संबंधित विभागांनी कायदेशीर बाबींची योग्य माहिती देऊन अर्जदारांचे समाधान करावे, जेणेकरून त्यांना वरच्या स्तरावर जाण्याची गरज भासणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. महानगरपालिकेने अतिक्रमणासंदर्भातील तक्रारींवर तातडीने कार्यवाही करून संबंधितांचे समाधान करावे. अन्यथा दोन खाजगी व्यक्तींमधील वाद लोकशाही दिनात येण्याची परिस्थिती निर्माण होते, असेही त्यांनी नमूद केले.

# 'छत्रपती संभाजीनगर २०४७' संकल्पनेसाठी सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिट स्थापन होणार-महापौर समीर राजूरकर

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- विकसित महाराष्ट्र २०४७'च्या धर्तीवर छत्रपती संभाजीनगर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी 'छत्रपती संभाजीनगर २०४७' ही संकल्पना राबविण्यात येणार असून त्यासाठी लवकरच सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिट स्थापन करण्यात येईल, असे प्रतिपादन माननीय महापौर श्री. समीर राजूरकर यांनी आज केले.



आज जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी महापौरांची भेट घेतली. यावेळी ते बोलत होते.

महापौर म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर शहराचा खऱ्या अर्थाने विकास साधायचा असेल तर घनकचरा व्यवस्थापन, ड्रेनेज व्यवस्था आणि पाणीपुरवठा सेवांवर विशेष लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

ते पुढे म्हणाले की, कर वसुली ही महापालिकेची आर्थिक कणा असून ती अधिक सक्षम आणि डिजिटल करण्यासाठी जागतिक बँकेची मदत महत्त्वाची ठरू शकते. माल मत्तांचे पुनर्सर्वेक्षण दर पाच वर्षांनी होणे आवश्यक असून यासाठीही जागतिक बँकेचे सहकार्य घेतल्यास चांगले परिणाम मिळू शकतात.

सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिट या संकल्पनेविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, पदाधिकारी किंवा अधिकारी बदलले तरी या युनिटची उद्दिष्टे बदलणार नाहीत, अशा पद्धतीने त्याची रचना करण्यात येणार आहे.

शहरातील खाम आणि सुखना या दोन नद्यांमध्ये जाणाऱ्या ड्रेनेजच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण आणण्यात आले आहे. यासोबतच शहरासाठी नवीन पाणीस्त्रोत निर्माण करण्यावरही लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी मित्रा संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या बैठकीस जागतिक बँकेचे हर्ष गोयल (वरिष्ठ जल विशेषज्ञ व संघप्रमुख), अंकुश शर्मा (वरिष्ठ वित्त विशेषज्ञ), श्रीनिवास राव पोडीपिरेड्डी (वरिष्ठ जल व स्वच्छता विशेषज्ञ), अतिरिक्त शहर अभियंता अनिल तनपुरे तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी संतोष वाहुळे उपस्थित होते.

# सभापती यांचे जय भवानी नगर येथे नाल्यांवरील अतिक्रमण हटवून सफाईचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- जय भवानी नगर येथील नाल्यांवरील सर्व अतिक्रमणे तात्काळ हटवून नाल्यांची संपूर्ण सफाई करण्यात यावी, असे निर्देश स्थायी समिती सभापती अनिल मकरीये यांनी आज दिले.



आज सकाळी ८ वाजता त्यांनी जय भवानी नगर ते झेंडा चौक या भागातील नाल्यांची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. पाहणीदरम्यान जय भवानी नगर येथे नाल्यामध्ये करण्यात आलेली एक बोरवेल त्यांच्या निदर्शनास आली. ही बोरवेल नागरिकांच्या आरोग्यासाठी गंभीर धोका ठरू शकते, असे सांगत त्यांनी सदरील बोरवेल तात्काळ हटविण्याचे आदेश दिले.

तसेच झेंडा चौक परिसरातील नाल्याची पाहणी करताना नाल्यावर अनधिकृतपणे बांधण्यात आलेली एक भिंत आढळून आली. ही भिंत त्वरित पाडण्याचे निर्देश त्यांनी दिले. याशिवाय नाल्याच्या उघड्या भागावर जाळ्या बसविण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. यावेळी नगरसेवक बालाजी मुंडे, नगरसेविका सुरेखा गायकवाड व संबंधित अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

मागील सोमवारी सभापती मकरीये यांनी मोती कारंजा ते संभाजी पेठ या परिसरातील नाल्यांची पाहणी करून साफसफाईचे निर्देश दिले होते. आज त्यांनी त्या कामांचाही आढावा घेतला.

मोती कारंजा येथे सुरू असलेल्या नाला सफाई कामाची पाहणी करताना काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री वाढविण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच नाल्याची हद्द निश्चित करण्यासाठी मोजणी करण्याच्या सूचनाही यावेळी करण्यात आल्या.

औषधी भवन परिसरातही सुरू असलेल्या नाला सफाई कामाची त्यांनी पाहणी केली. संबंधित दोन्ही ठिकाणांवरील कामे पुढील चार दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

# जनगणनाचे कामात कसूर केल्यावर गुन्हा दाखल करू-आयुक्त येडगे

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- देशभरात जनगणनेची प्रक्रिया राबविण्यात येत असून छत्रपती संभाजीनगर जिल्हा तसेच महानगरपालिका हद्दीतही ही प्रक्रिया सुरू आहे.

मात्र, काही शिक्षक जनगणनेचे कर्तव्य बजावण्यास टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात आज सकाळी झालेल्या बैठकीत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना कडक निर्देश दिले.

जनगणनेसाठी आदेश प्राप्त होऊनही ड्युटीवर हजर न राहणाऱ्या शिक्षकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. तसेच महानगरपालिका शाळांमध्ये कार्यरत असल ेल्या आणि आदेशानंतरही अनुपस्थित राहणाऱ्या शिक्षकांवर निलंबनाची कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. ज्या शिक्षकांना जनगणनेचे आदेश प्राप्त झाले आहेत त्यांनी तात्काळ आपल्या कर्तव्यावर रुजू होऊन संबंधित अहवाल सादर करावा, असे निर्देश आयुक्त श्री. येडगे यांनी दिले आहेत. अन्यथा संबंधितांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. मनपा आस्थापनेवरील कर्मचारी ज्यांनी अजूनही स्वगणना केली नाही त्यांची माहिती घेऊन त्यांची पगार कपात करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
**OLD NAME** 1) ZAKIR KHAN RASHEED KHAN PATHAN
2) ZAKER KHAN PATHAN
**NEW NAME** ZAKER KHAN RASHEED KHAN PATHAN
**Address** NEAR SUMAYYA MASJID IDGAHA NAGAR, AURANGABAD TALUKA SILLOD 431112 MH

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
**OLD NAME -** SALEHA KAUSAR AARIFODDIN SAYYED
**NEW NAME -** SALEHA KAUSAR ZAKER KHAN PATHAN
**Address** NEAR SUMAYYA MASJID IDGAHA NAGAR - AURANGABAD TALUKA SILLOD 431112 MH

## 'एसआयआर'वरुन कोर्टात..

अंतर हे एसआयआर प्रक्रियेत वगळलेल्या मतदारांच्या संख्येपेक्षा कमी आहे. एका जागेचे उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, तिथे टीएमसी उमेदवाराचा पराभव केवळ ८६२ मतांनी झाला, मात्र त्याच मतदारसंघात ५,४३२ मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली होती. जर ही नावे असती, तर निकाल वेगळा लागला असता. संपूर्ण राज्यात भाजप आणि टीएमसीमध्ये ३२ लाख मतांचा फरक आहे, तर मतदार यादीतून नाव वगळल्याप्रकरणी सुमारे ३५ लाख जणांचे अर्ज प्रलंबित आहेत.

मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने या युक्तिवादाची दखल घेतली. न्यायालयाने म्हटले की, 'जर विजयाचे अंतर आणि वगळण्यात आलेली मते यामध्ये तफावत असेल, तर ममता बॅनर्जी आणि संबंधित ३१ जागांचे उमेदवार स्वतंत्र याचिका दाखल करू शकतात.' महत्त्वाचे म्हणजे, यात ममता बॅनर्जी यांच्या भवानीपूर मतदारसंघाचाही समावेश असण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, निवडणूक आयोगाने या दाव्यांना विरोध केला आहे. निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की, निवडणुकीत काहीही अडचण आल्यास निवडणूक याचिका दाखल करणे हाच एक मार्ग आहे. प्रत्येक छोट्या तांत्रिक गोष्टीसाठी वेगळी केस करता येणार नाही.

दरम्यान, नुकत्याच झालेल्या २९४ जागांच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने २०७ जागा जिंकून ऐतिहासिक यश मिळवले असून राज्यात पहिल्यांदाच भाजपचे सरकार स्थापन झाल े. टीएमसीला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले. या निवडणुकीत ९० टक्क्यांहून अधिक मतदान झाले होते. दुसरीकडे, सुप्रीम कोर्टाच्या या भूमिकेनंतर आता ममता बॅनर्जी आणि त्यांचे ३१ उमेदवार पुन्हा न्यायालयात धाव घेण्याची शक्यता आहे. जर न्यायालयाने या जागांवर फेरविचार केला, तर बंगालच्या राजकारणात मोठी उलथापालथ होऊ शकते.

## सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराला...

घेतलेल्या पहिल्या मोठ्या कामांपैकी एक म्हणजे सोमनाथ मंदिराचा पुनर्निर्माण असल्याचे सांगण्यात आले. यासाठी सरदार वल्लभभाई पटेल आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मोठे प्रयत्न केले. मात्र, त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून मोठा विरोध झाला होता, असा दावाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. तसंच, सरदार पटेल यांच्या ठाम भूमिकेमुळेच तीव्र विरोध असूनही सोमनाथ मंदिराचा जिर्णोद्धार झाला आणि शतकानुशतके लागलेला कलंक देशाने पुसून टाकला, असंही त्यांनी पुढे नमूद केलं.

## पश्चिम आशियातील तणावावर...

साखळी आणि आवश्यक वस्तूंच्या देशांतर्गत उपलब्धतेचा आढावा घेण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार सर्व आवश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रभावी काम करत आहे.''

राजनाथ सिंह यांनी नागरिकांना कोणतीही भीती न बाळगण्याचं आवाहन केलं. पुरवठा साखळीत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी सरकारने ठोस पावले उचलल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. त्यांच्या मते, जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी जनसहभाग महत्त्वाचा असून पंतप्रधान मोदी यांचं आत्मनिर्भरता आणि ऊर्जा सुरक्षेबाबतचं आवाहन अत्यंत महत्त्वाचं ठरणार आहे.

## मी माफी मागणार नाही,...

समितीच ते वक्तव्य एकनाथ शिंदे यांच्याविषयी असल्याचे सांगत आहे. आपले वक्तव्य हे हॅबिटॅट स्टुडिओची तोडफोड करणाऱ्यांविरोधात होते. मात्र त्याचा विपर्यास करण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी समितीने आपल्यावर होणारी कारवाई ही राजकीय कारणाने होत असल्याचे वाटत आहे का, असे विचारले असता त्याला सुषमा अंधारे यांनी होकार दर्शवताना आपल्यावर होत असलेली ही कारवाई आपण कोणत्याही ईडी किंवा सीबीआय सारख्या यंत्रणेत अडकू शकत नाही. त्यामुळे अशा प्रकारे राजकीय आकसापोटी ही कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे समिती जो निर्णय देईल तो मान्य आहे.

आपण कोणत्याही असंसदीय शब्दाचा वापर केलेला नाही. आपल्या वक्तव्याबद्दल आपण माफी मागणार नाही. समिती जी शिक्षा करेल ती भोगण्यास तयार असल्याचे सुषमा अंधारे म्हणाल्या. आपण कुणाल कामराला वैयक्तिकरीत्या ओळखत नसल्याचेही त्यांनी समितीसमोर स्पष्ट केले.

Truhome FINANCE

**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनीः** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइटः** http://www.truhomefinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

**परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात**) सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि १५.०६.२०२६ रोजी स.११.०० ते दु १२.००** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|
| **१) श्री. संतोष विठ्ठल दहिते (कर्जदार)**<br>**२) सौ. लता संतोष दहिते (सह-कर्जदार)**<br>**3) श्री. दुष्यंत संतोष दहिते**<br>**सर्व रहिवासी पत्ता: आर एच २७ १७ न्यू सुयोग हाउसिंग सोसायटी बजाज नगर, वडगाव कोल्हाटी, औरंगाबाद महाराष्ट्र-४३१११३**<br>**तसेच येथे- एफ. नं. ४, गट नं. ५२/१, सारा वेंकटेश, वाळूज, भोंडवे शाळेजवळ, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१११३६**<br>**तसेच येथे - फ्लॅट नं. १२, तिसरा मजला, विंग-१, सी-१, टाईप बिल्डिंग सारा वेंकटेश, गट नं. ५२/१, एमआयडीसी वाळूज, वडगाव कोल्हाटी, औरंगाबाद-४३१११३६**<br>**कर्ज खाते क्रमांक SHLHAURD0000525 आणि STUHAURD0000934**<br>**ताबा दिनांक व ताबा प्रकार**<br>**२२ नोव्हेंबर २०२५, प्रत्यक्ष ताबा**<br>**ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | मागणी सूचना तारीख: ०९/०५/२०२५<br>दिनांक ०६/०५/२०२५ रोजी कर्ज खाते क्र. SHLHAURD0000525 अंतर्गत रु. १६,००,६११ /- (फक्त सोळा लाख सहाशे अकरा रुपये) आणि दिनांक ०६/०५/२०२५ रोजी कर्ज खाते क्र. STUHAURD0000934 अंतर्गत रु. २,०४,०५३/- (फक्त दोन लाख चार हजार त्रेपन्न रुपये) उक्त नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, करारानुसार दराने पुढील व्याजासह. | रु. १८,०३,०४०/- (फक्त अठरा लाख तीन हजार चाळीस रुपये)<br>**बोली वाढविणे :** रु. १०,०००/- आणि त्यापटीने<br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )**<br>रु. १,८०,३०४/- (फक्त एक लाख ऐंशी हजार तीनशे चार रुपये)<br>**ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : १२ जून, २०२६ वेळ सकाळी १० ते सायं ५.००** | **१५ जून २०२६**<br>**वेळ. सकाळी ११.०० ते दुपारी १२.००** | **देबज्योती रॉय ९८७४७०२०२१**<br>**सतीश बनसोड ९७३००४७५७२**<br>**मयुरेश जाधव ९८३३०१७२२१**<br>**अजय झांजोट ९८२३३९०९९०**<br>**मालमत्ता तपासणीची तारीख: १२.०६.२०२६ वेळ दुपारी १२.००. दुपारी ३.०० वाजेपर्यंत** |

**संपत्तीचे विवरण**

फ्लॅट क्रमांक १२, कार्पेट क्षेत्रफळ ३२.५१ चौ. मी., बिल्डींग ३०.२६ चौ. मी., तिसरा मजला, विंग-१, सी-१, टाईप बिल्डिंग सारा वेंकटेश, गट क्रमांक ५२/१, एमआयडीसी वाळूज, वडगाव कोल्हाटी, औरंगाबाद, या जागेचा संपूर्ण भूखंड, ज्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत- पूर्व: फ्लॅट क्रमांक ११ विंग ०१, पश्चिम: बाजूची मार्जिनल जागा, दक्षिण: बाजूची मार्जिनल जागा, उत्तर: बाजूची मार्जिनल जागा

**०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**
**०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- अॅक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी ००००२३० येथे जमा करावी:**

ठिकाण - औरंगाबाद
दिनांक - १२-०५-२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )